## सुविचार

तुमच्या पहिल्या यशा नंतर अजिबात थांबू नका कारण जर तुम्ही दुसऱ्या प्रयत्नात अयशस्वी झालात तर पहिले यश हे फक्त नशिबामुळे मिळाले हे बोलायला लोक तयारच असतात.

- स्वामी विवेकानंद

आपला आवाज आपली शक्ती

# जनशक्ति

जळगाव येथून प्रकाशित होणारे निष्पक्ष, निर्भीड दैनिक

epaper.janashakti.in » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ » वर्ष : ७३ » अंक : २७० शुक्रवार १७ जुलै २०२६ » जळगाव/नाशिक/धुळे/नंदुरबार » पाने ६ » किंमत : २ रुपये

## अंतरंग


- **जळगाव जिल्हा** - भुसावळ पंचायत समितीवर...
- **दृष्टीकोन** - त्यांचे म्हणणे ऐका
- **जीवनशक्ती** - दूध नेमके कधी प्यायलेले चांगले
- **जनशक्ति विशेष** - मुंबईत मलेरिया, डेंग्यूचे थैमान


## शॉर्ट न्यूज

### तापी नदीच्या पुलावरून तरुणाची आत्महत्या

**धुळे ।** शिरपूर जवळील गिधाडे तापी नदी पुलावरून उडी घेऊन एका २८ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने तापी पुलावरून एक भावनिक व गंभीर आरोप करणारा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल केला होता. संदीप उदेसिंग गिरासे (२८), रा. अहिल्यापूर, शिरपूर असे मृत तरुणाचे नाव आहे. दोन दिवसांपूर्वी त्याने नदीत उडी घेतली होती. काल सकाळी त्याचा मृतदेह तापी नदीपात्रात आढळून आला. या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी शिरपूर शहर पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले असून, आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतला होता. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये संदीपने आपण काम करत असलेल्या टेक्सटाईल पार्क कंपनीत आपल्यावर मोठा अन्याय झाल्याचे म्हटले आहे. कंपनीत त्याच्यासोबत काम करणाऱ्या दोन मुलींनी आपल्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप त्याने केला. या प्रकरणानंतर कंपनीच्या मालकांनी आणि प्रशासनाने त्याला कामावरून काढून टाकले होते. कंपनीत परप्रांतीय लोकांना वाचवले जाऊ शकते, मात्र महाराष्ट्राच्या स्थानिक तरुणाला न्याय दिला जात नाही, अशी उद्विग्न भावनाही संदीपने व्हिडिओत मांडली होती. तापी पुलावर संदीपचा मोबाईल, मोटरसायकल आणि चप्पल पोलिसांना आढळून आली होती. दोन दिवस स्थानिक प्रशासन आणि पट्टीचे पोहणारे नदीपात्रात त्याचा शोध घेत होते अखेर काल त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. संदीपच्या मृत्यूची बातमी समजताच अहिल्यापूर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने शिरपूर पोलीस ठाण्याबाहेर जमा झाले.

# विठ्ठल चरणी अर्धा किलो वजनाच्या सोन्याच्या पादुका : अज्ञात भाविकाचे दान!

## अंदाजे किंमत ५६ लाख ५९ हजार रुपये , भाविक आहील्यानगरचा ?


। पंढरपूर ।

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी राज्यासह देशभरातून लाखो भाविक दाखल होत आहेत. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या कालावधीत भाविकांकडून मंदिर समितीकडे रोख देणगीबरोबरच सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तूंच्या स्वरूपातही मोठ्या प्रमाणात दान प्राप्त होत आहे. काल गुरुवार दि. १६ जुलै रोजी एका दानशूर भाविकाने आपले नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर सोन्याच्या पादुका दान स्वरूपात विठ्ठल चरणी अर्पण केल्या आहेत. या पादुकांचे वजन ४४६ ग्रॅम आहे. त्यांची अंदाजे किंमत ५६ लाख ५९ हजार रुपये इतकी होत आहे.

अहिल्यानगर येथील भाविकाने या सोन्याच्या पादुका दान स्वरुपात दिल्या असल्याची माहिती कळाली आहे. दिवसेंदिवस विठ्ठलाच्या खजिन्यात विविध सोन्याच्या दागिण्यांची वाढ होत आहे. या अगोदर विठ्ठलाला चांदीच्या पादुका घातल्या जात होत्या. आता यापूढे विविध प्रसंगी विठ्ठलाला सोन्याच्या पादूका घालण्यात येतील. तसेच भाविकांनी दान केलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सोने, चांदी वस्तू दान करण्यासाठी स्वतंत्र दान कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या कक्षामध्ये दान स्वरूपात प्राप्त होणाऱ्या मौल्यवान वस्तूंची तपासणी, शुद्धता पडताळणी, वजन, नोंदणी व सुरक्षित स्वीकार करण्यासाठी दोन सराफ तसेच अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे सोने, चांदीच्या मौल्यवान वस्तू दान करावयाच्या आहेत, त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयात संपर्क साधून अधिकृत पावतीसह दान करावे, असे आवाहन मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी केले आहे. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम तसेच लेखाधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते.





### २४ तास दर्शन सुरू

» **आषाढी** यात्रेदरम्यान भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन, दि.१६ जुलै रोजी श्रींचा पलंग काढून मूर्तीच्या पाठीशी लोड, तर श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२ तास १५ मिनिटे पदस्पर्श दर्शन सुरू राहणार आहे. व्हीआयपी दर्शन व टोकन दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. एका दानशूर भाविकांने नाव न सांगण्याची इच्छा व्यक्त करत सुमारे अर्धा किलो सोनेच्या पादुका विठ्ठल चरणी दान केल्या आहेत. त्यामुळे विठ्ठलाचे चरण सुवर्णमय झाले आहेत. ज्या दिवशी आपण श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार घालतो, त्या दिवशी या पादुका घालण्यात येणार आहेत. तसेच आषाढी एकादशीला मुख्यमंत्री यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय महापूजेवळी देखील या सोन्याच्या पादुका विठ्ठलाला घातल्या जाणार आहेत. असे गहिनीनाथ महाराज औसेकर, सहअध्यक्ष मंदिर समिती यांनी सांगितले.




# वांगचुक आणि दिपकेच्या समर्थनात आदित्य ठाकरेंचे शिवतीर्थावर आंदोलन

## रविवारी जमण्याची तरुणांना दिली हाक

**मुंबई ।** नीट पेपरफुटीप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक गेल्या १९ दिवसांपासून दिल्लीत उपोषण करत आहेत. कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपकेंनी उभारलेल्या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा वाढत असताना, वांगचुक आणि दिपके यांच्या समर्थनात आदित्य ठाकरेंनी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वांगचुक आणि दिपकेंना पाठिंबा देण्यासाठी रविवारी (१९ जुलै) शिवतीर्थावर एकत्र येण्याचे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे, असेही ठाकरेंनी म्हटले आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि मृत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी आंदोलन उभारले आहे. दिल्लीत गेल्या २५ दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. यात सोनम वांगचुक यांनी सहभागी होत उपोषणाची हाक दिली. गेल्या १९ दिवसांपासून वांगचुक उपोषण करत असून, सरकारकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. दरम्यान, वांगचुक यांच्या समर्थनात अनेक राजकीय नेते, अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते उतरले आहेत. आदित्य ठाकरेंनी देखील आता वांगचुक आणि दिपकेंच्या समर्थनात रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

### रविवारी एकत्र येण्याचे आवाहन

» **वांगचुक,** दिपके आणि युवकांनी पाठिंबा देण्यासाठी व भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी एकत्र येऊया, असे आवाहन आदित्य ठाकरेंनी केले आहे. १९ जुलै, रविवारी, शिवतीर्थावर, माँसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ ४ वाजता एकत्र येण्याचे आवाहन आदित्य यांनी केले आहे. हा लढा राजकीय पक्षाचा नसून, सर्वांचा आहे, असेही ठाकरेंनी पुढे म्हटले आहे. उद्धव ठाकरेंनी देखील काही दिवसांपूर्वी दिपके आणि वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. आता आदित्य यांनी दिपके आणि वांगचुक यांच्या समर्थनात प्रत्यक्ष रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

# राज्यातील काही भागात आज वादळी पावसाची शक्यता



**मुंबई ।** मागील काही दिवसांपासून राज्यात पावसाने विश्रांती घेतली असून त्यामुळे अनेक भागात उकाड्यात काहीशी वाढ झाली आहे. काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत असली तरीही राज्यात सर्वदूर पावसासाठी पोषक हवामान स्थितीची गरज आहे. दरम्यान, राज्यातील काही प्रदेशात गुरुवारपासून वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच राज्यातील कमाल तापमानात पुढील तीन - चार दिवस फारसा बदल होणार नाही, अशी शक्यताही हवामान विभागाने व्यक्त केली आहे. राज्यात यंदा मान्सूनचे आगमन उशिराने झाले. त्यानंतरही मराठवाडा, विदर्भातील काही आणि मध्य महाराष्ट्रातील बहुतांश भागात समाधानकारक पावसाची नोंद झालेली नाही. जुलै महिन्याच्या सुरुवातील कोकण किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्रातील घाट माथ्यावर अतिवृष्टी सदृश्य पाऊस नोंदला गेला. मात्र, त्यानंतर पावसाने विश्रांती घेतली असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेंचे वातावरण आहे. शेतीसाठी जुलै महिना अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तसेच अनेक भागात धरणसाठाही चिंताजनक स्थितीत आहे. दरम्यान, यंदा संपूर्ण मान्सूनच्या हंगामावर प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीचा प्रभाव राहील, असा अंदाज हवामान विभागाने याआधीच व्यक्त केला असून यंदा दीर्घकालीन सरासरीच्या कमी पावसाची शक्यताही व्यक्त केली आहे.

### पुढील तीन दिवस पावसाची शक्यता कुठे ?

» **दरम्यान,** वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली. त्यामुळे ओडिशा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशाच्या किनारी भागात पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात १६ ते २१ जुलैदरम्यान विदर्भातील काही भागात पावसाचा अंदाज असून १८ ते १९ जुलैच्या दरम्यान काही भागात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यात व्यक्त करण्यात आली आहे. तसेच कोकण प्रदेशासह, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही आणि विदर्भातील काही भागात गुरुवारी पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे, तर मध्य महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील काही भागात शुक्रवारी वादळी पावसाचा अंदाज आहे.

# २५ हजारांच्या गुंगीकारक औषधांसह मालेगावातील 'दाऊद' जाळ्यात

**धुळे ।** स्थानिक गुन्हे शाखेने गुंगी येणार्या औषधांचा तब्बल २५ हजारांचा साठा मालेगावातील संशयीताकडून जप्त केला आहे. ही कारवाई मोराणे, ता.धुळे येथे बुधवारी करण्यात आली.शकील सैय्यद दाऊद (३६, नोमाणी नगर, मालेगाव, जि.नाशिक) असे अटकेतील संशयीताचे नाव आहे. धुळे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना मोराणे गावाजवळ संशयीत गुंगीकारक औषधांचा साठा बाळगून असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पथकाला निर्देश दिले. बुधवार, १५ रोजी पथकाने मोराणे गावाजवळील महामार्गावरून शकील



सैय्यद दाऊद (३६, नोमाणी नगर, मालेगाव, जि.नाशिक) यास ताब्यात घेतले. आरोपीच्या ताब्यातून २४ हजार ७३० रुपये किंमतीचा गुंगीकारक औषधांचा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, पोलीस उपनिरीक्षक अमरजीत मोरे, शशिकांत देवरे, मुकेश वाघ, धर्मेंद्र शेंडे आणि विवेक वाघमोडे आदींच्या पथकाने केली.

# धुळ्यात तीन लाखांच्या गांजासह दोघे जाळ्यात

**धुळे ।** स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून तीन लाखांचा सुमारे १२ किलो १०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.. या कारवाईत दोन संशयितांना अटक करण्यात आली. धुळे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना आंबेडकर चौक परिसरातील विश्वकर्मा भवनाजवळ काही जण गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने थांबले असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून छापा टाकला. या कारवाईत निखील गोकुळ पाटील (२५, रा.छोरिया नगर, डी.मार्टजवळ, धुळे) व चेतन जीवन पावरा (२१, रा.प्लॉट क्र. ८१, सैनिक कॉलनी, नगावबारी, धुळे) यांना ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान आरोपींकडून १२ किलो १०० ग्रॅम वजनाचा



व तीन लाख रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला तर गुन्ह्यात वापरलेली ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी (एम.एच.१८ बी.के.०३११) जप्त करण्यात आली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, पोलीस उपनिरीक्षक अमित माळी, अंमलदार आरीफ पठाण, राहुल सानप, संदीप पाटील, देवेंद्र ठाकूर, अमोल पाटील, सिद्धार्थ निकम आदींच्या पथकाने केली.

# भरधाव कार रिक्षाला धडकली, वरणगावातील युवक ठार

**भुसावळ ।** भरधाव वेगाने जाणार्या कारने समोरून रिक्षेला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात वरणगावातील रिक्षा चालकाचा मृत्यू झाला. हा अपघात भुसावळ तालुक्यातील कुर्हा गावाजवळ मंगळवार, १४ जुलै दुपारी घडला. कारचालकाविरुद्ध भुसावळ तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मंगळवारी दुपारी सुमारे ३.३० वाजेच्या सुमारास कु-हा गावाजवळील पेट्रोल पंपासमोर संशयीत आरोपी मनिष संघवे याने कार (एम.एच.१९ सी.व्ही.७०८१) भरधाव वेगात व रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवत समोरनू येणारी रिक्षा (एम.एच.२० ई.के.३४४०) जोरदार धडक दिली. या धडकेत रिक्षा चालक हर्षल प्रकाश गायकवाड (२८, रा. सिद्धेश्वर नगर, वरणगाव) याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्याला तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेने गायकवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.



अपघात प्रकरणी प्रकाश जुलाल गायकवाड (५७, वरणगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनीष अदिनाथ संघवे (४३, रा.खेडी बु.।।, ता. जळगाव) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. दरम्यान, अपघातात रिक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कारचेही नुकसान झाल्याचे पोलिसांनी सांगितले. तपास पोलीस निरीक्षक निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार धीरज मंडलिक करीत आहेत.

# जळगाव, भुसावळ मार्गे धावणारी एलटीटी-बरेली साप्ताहिक एक्स्प्रेस रद्द

। जळगाव प्रतिनिधी।

**उत्तर** महाराष्ट्रातील जळगाव आणि भुसावळ तसेच मनमाड, नाशिक रोड, कल्याण या स्थानकांवर थांबा असलेल्या लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी)-बरेली साप्ताहिक एक्स्प्रेसच्या दोन्ही दिशांतील फेऱ्या तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या आहेत. उत्तर रेल्वेच्या मुरादाबाद विभागातील बरेली यार्ड येथे वॉशिंग लाईनच्या देखभाल व दुरुस्तीची महत्त्वपूर्ण कामे हाती घेण्यात येणार असल्याने रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे उत्तर महाराष्ट्रातून उत्तर भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांना काही दिवस पर्यायी गाड्यांचा आधार घ्यावा लागणार आहे.

रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १४३१३ लोकमान्य टिळक टर्मिनस-बरेली साप्ताहिक एक्स्प्रेस २० जुलै ते ३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटणाऱ्या सर्व नियोजित फेऱ्यांसाठी रद्द राहणार आहे. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक १४३१४ बरेली-लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक एक्स्प्रेस १८ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत बरेली येथून सुटणाऱ्या सर्व नियोजित फेऱ्यांसाठी रद्द करण्यात आली आहे.




» **बरेली** यार्डातील वॉशिंग लाईन ही रेल्वेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सुविधा असून, येथे गाड्यांच्या रेकची स्वच्छता, तांत्रिक तपासणी, देखभाल आणि पुढील प्रवासासाठी आवश्यक तयारी केली जाते. या ठिकाणी नियोजित देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेतल्याने काही काळासाठी रेकच्या उपलब्धतेवर परिणाम होणार आहे. परिणामी, सुरक्षित आणि सुरळीत रेल्वे वाहतूक राखण्यासाठी संबंधित गाड्यांच्या फेऱ्या तात्पुरत्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एलटीटी-बरेली साप्ताहिक एक्स्प्रेस ही मुंबई महानगर परिसरातून उत्तर महाराष्ट्र मार्गे उत्तर प्रदेशकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची रेल्वे सेवा मानली जाते. या गाडीला महाराष्ट्रात कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव आणि भुसावळ या प्रमुख स्थानकांवर थांबा आहे. त्यामुळे जळगाव, भुसावळ आणि परिसरातील अनेक प्रवासी या गाडीद्वारे बरेलीसह उत्तर प्रदेशातील विविध भागात आणि उलट दिशेला नाशिक, मुंबईकडे प्रवास करतात. मात्र, ही सेवा काही दिवस बंद राहणार असल्याने या मार्गावरील प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. विशेषतः शैक्षणिक, व्यावसायिक, वैद्यकीय उपचार तसेच कौटुंबिक कारणांसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आपल्या प्रवासाचे पुन्हा नियोजन करावे लागणार आहे.

# पोलीस भरती : ऑनलाइन परीक्षा बंद करा

## नाशिकमध्ये तरुण आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

। नाशिक प्रतिनिधी।

नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रातील हजारो युवक-युवती पोलीस भरतीची तयारी करीत आहे. मात्र, पोलीस भरती प्रक्रियेत नियमित वेळापत्रक नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण होतो. तसेच भरती प्रक्रिया उशिराने होत असल्यामुळे अनेकांचे शैक्षणिक, आर्थिक मानसिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाप्रमाणे (एमपीएससी) पोलीस भरतीचे दरवर्षी निश्चित वार्षिक वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या विद्यार्थ्यांचा ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या लेखी परीक्षेवर आक्षेप आहे.

पोलीस भरतीचे निश्चित वेळापत्रक नसल्याने तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असतो. या संदर्भात समीर काकड, मनिष बोरस्ते, नागराज गुंजाळ, आकाश सोनवणे आदी युवकांनी नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याकडे निवेदन सादर केले. या माध्यमातून पोलीस भरती प्रक्रियेतील अनेक प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. करोना महामारीच्या काळात जवळपास दोन ते तीन वर्ष भरतीची प्रक्रिया नियमितपणे पार पडू शकली नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना तयारी करण्याची संधी मिळाली नाही. अनेक उमेदवार वयोमर्यादा ओलांडण्याच्या स्थितीत आले आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी विशेष बाब म्हणून वयोमर्यादेत योग्य ती वाढ करावी, असाही त्यांचा आग्रह आहे.



### ऑनलाइन परीक्षेत समान संधीचा अभाव

» **सध्या** पोलीस भरतीची लेखी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाते. ऑनलाईन परीक्षेत तांत्रिक अडचणी, सर्व विद्यार्थ्यांना समान सुविधा उपलब्ध नसणे, तसेच पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे पोलीस भरतीची लेखी परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाईन (लेखी) पद्धतीने घेण्याची मागणी युवकांनी केली.

### शासनाकडे शिफारस करण्याचा आग्रह

» **महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाप्रमाणे पोलीस भरतीचे दरवर्षी निश्चित वार्षिक वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना तयारीचे नियोजन करता येईल. करोना काळात भरती रखडल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. हे नुकसान भरून काढण्यासाठी विशेष वाढ अर्थात वयो मर्यादेत सवलत देण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलीस भरतीच्या ऑनलाइन पद्धतीच्या परीक्षेला तरूणांचा विरोध आहे. ही परीक्षा ऑफलाईन (लेखी) पद्धतीने घ्यावी, जेणेकरून परीक्षा पारदर्शक, विश्वासार्ह आणि सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देणारी ठरेल, असे युवकांचे म्हणणे आहे. पोलीस भरती प्रक्रिया नियमित, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक त्या सूचना संबंधित विभागाला देण्याची मागणी युवकांनी निवेदनातून जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासनाकडे शिफारस करावी असेही आकाश सोनवणे, आकाश जाचक, मनिष बोरस्ते, नागराज गुंजाळ, प्रतिक जगताप आदींनी म्हटले आहे.

जनशक्ति
जीवनशक्ती
www.ejanshakti.com



# दूध नेमके कधी प्यायलेले चांगले?

**आपल्या** आहाराच्या दृष्टीने दूध हे पूर्णान्न असते. लहान मूल तर जन्मानंतर जवळपास दीड वर्ष फक्त दुधावरच असते. पण आपण जसंजसे मोठे होत जातो तसे दूध पिण्याचे प्रमाण कमी होते. दुधात शरीराला आवश्यक असणारे अनेक पोषक घटक असतात. दुधात कार्बोहायड्रेट्स, फॅट्स आणि प्रोटीन्स तर भरपूर असतातच, पण ए, बी-१, बी-२, बी-३, बी-५, बी-६, बी-१२, सी, इ, के, डी ही जीवनसत्वेसुध्दा मुबलक असतात. याशिवाय कॅल्शियम, आयर्न, मॅग्नेशियम, मँगेनीज, तांबे, पोटॅशियम, सेलेनियम, झिंक, फॉस्फरस ही खनिजे उत्तम प्रमाणात उपलब्ध असतात. एक कप शुध्द दूध प्यायल्यावर आपल्या शरीराला साधारणतः १४० कॅलरीज मिळतात.

सुदृढ प्रकृतीसाठी, रोगप्रतिकारक शक्ती उत्तम राहण्यासाठी, हाडे बळकट होण्यासाठी आणि मुख्य म्हणजे आरोग्य उत्तम राहायला दुधासारखा दुसरा पर्याय नाही. पण दूध कोणत्या वेळेला, किती प्रमाणात आणि कशा पद्धतीने प्यावे याबाबत सामान्यांमध्ये बरेच गैरसमज असतात. त्यामुळे त्याची नेमकी माहिती असल्यास त्यातील पोषक घटक जास्त चांगल्या पद्धतीने मिळतात.

### सकाळी दूध घेणे

- सकाळी उठल्यावर व्यायाम आणि प्रातविधी झाल्यानंतर दूध घेतल्यास त्यातून मिळणारी पोषक द्रव्ये शरीराला दिवसभर ऊर्जा देतात. त्यामुळे दिवसभर शरीरातील उजेर्चा पातळी टिकून राहण्यासाठी दूध सकाळी घेतलेले उत्तम.
- काहींच्या मते सकाळी उठल्यावर दूध पिणे जड असते, कारण पचनसंस्थेला सकाळी दूध पचवणे त्रासाचे ठरते. मात्र परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. दूध हे पचायला सोपे असते. सकाळी उठल्यावर मांस, मटण, केक, क्रीमरोल यांसारखे पदार्थ पचायला जड असतात.
- आरोग्याच्या नियमानुसार सकाळी व्यायाम करून दूध आणि त्याबरोबर काही तंतुमय पदार्थ खावा. उदा. पोहे, फळे, ला'। किंवा कॉर्नफ्लेक्स. त्याचप्रमाणे प्रोटीन्स जास्त असलेली अंडी खायला हरकत नाही. याचा उपयोग उर्जा मिळवण्यासाठी आणि स्नायूवर्धन होण्यास नक्की होतो.



### रात्री दूध घेणे

- रात्री झोपण्यापूर्वी दूध घेतल्यास त्यामुळे पोटातली ॲसिडिटी कमी होते. मात्र यासाठी दूध कपभर किंवा ग्लासभरच घ्यावे आणि झोपण्यापूर्वी किमान तासभर आधी घ्यावे.
- दुधामध्ये असलेले ट्रिप्टोफॅन या अमायनो ॲसिडमुळे सिरोटोनिन आणि मेलाटोनिन ही मेंदूवर इच्छित परिणाम करणारी दोन द्रव्ये जास्त प्रमाणात तयार होतात. त्यामुळे वेळेवर झोप येते, तसेच ती शांत आणि पूर्ण होण्याची शक्यता जास्त असते.
- ज्या व्यक्तींचे रात्री पाय दुखतात त्यांचे दुखणे दुधामध्ये असलेल्या मँगनीजमुळे कमी होते. हा त्रास औषधाशिवाय नियंत्रणात येतो.

### काही महत्त्वाच्या सूचना

- काही व्यक्ती कच्चे दूध पिणे पसंत करतात. मात्र ते स्वच्छ आणि शुध्द आहे याची खात्री करावी. दूध खूप तापवल्याने त्यातील काही प्रथिने आणि जीवनसत्वे नष्ट होऊ शकतात.
- दूध नैसर्गिक स्वरूपातले असावे. पावडरचे दूध किंवा बॉक्समधले दूध चहा कॉफीसाठी एखादवेळी ठीक, पण तब्येतीसाठी नैसर्गिकच दूध जास्त उपयुक्त असते.
- आम्ल पित्ताचा त्रास असणाजी-7ांनी थंड दूध घ्यावे.
- दुभत्या जनावरांना जर ॲंटिबायोटिक्स, हार्मोन्स वापरली असतील तर त्याचे दुष्परिणाम आपल्यावरही होतात.
- थोडक्यात, 'कधीही प्या, पण दूध प्या' सकाळी प्या किंवा रात्री प्या, हवे तर दोन्ही वेळेस प्या' हा मुख्य संदेश आजच्या तरुणपिढीने आणि लहान मुलांनी लक्षात ठेवला पाहिजे.

# घरात एक्वेरियम ठेवण्यापूर्वी काही गोष्टी जाणून घ्या

**लोक घरात अनेक प्रकारचे पाळीव प्राणी पाळतात. असं आवश्यक नाही की पाळीव म्हणून आपण कुत्रे किंवा मांजरच पाळावे. बऱ्याच बायकांना घरात एक्वेरियम ठेवणे आवडते. आपल्या डोळ्या समोर मासे पाण्यात खेळताना चांगले वाटते. एवढेच नव्हे तर घरात एक्वेरियम ठेवल्यानं घराचे सौंदर्य खुलते. बऱ्याच बायकांना घरात एक्वेरियम ठेवताना मनात शंका असतात. म्हणून त्यांना कळत नाही की घरात एक्वेरियम ठेवावे किंवा नाही. घरात एक्वेरियम ठेवल्यावर त्यांची योग्यरित्या काळजी कशी घ्यावी. जर आपल्या मनात देखील असे काही विचार आहे तर आम्ही सांगत आहोत या गोष्टीं बद्दल. चला तर मग जाणून घेऊ या .**

### फिश टॅंक ची देखभाल करणे महागडे आहे-

हे खरे आहे की एक्वेरियम जेवढे मोठे असेल त्याची निगा राखणे देखील तेवढेच सोपे असते. ताज्या पाण्याच्या टाक्यातीळ मासे राखणे सोपे असते. ताज्या पाण्यात टाक्याच्या जो खर्च होतो तो आहे फिश फूड, फिल्टरेशन आणि पुरेसा प्रकाश. या सर्वांमध्ये फार कमी खर्च येतो.



### टॅंक मधून पाणी बदलावे लागते -

महिलांचा असा विश्वास आहे की जर त्या एक्वेरियम ठेवतात तर त्यांना टाकीचे पाणी दररोज बदलावे लागणार पण खरं तर असं आहे की जर आपण दररोज टाकीचे पाणी बदलता तर या मुळे आपले मासे मरू देखील शकतात, एवढेच नव्हे तर आपल्याला टाकीचे पाणी दररोज पूर्ण बदलायचे नाही तर आपल्याला टाकीचे पाणी दर आठवड्यात दहा ते वीस टक्केच बदलायचे आहे. हे माहित नसेल की पाण्यातील जिवाणू माशांना जिवंत राहण्यास मदत करतात. पाणी पूर्ण पणे बदलणे हे हानिकारक होऊ शकत.

### निसगार्ला नुकसान करणं-

काही बायका विचार करतात की जर त्या घरात एक्वेरियम ठेवतात तर या मुळे त्या नैसर्गिक वातावरणाला हानी पोहोचवत आहे तर असं काही नाही. दुकानात विकल्या जाणाऱ्या मासे तिथेच उत्पन्न करतात. हे मासे नैसर्गिक वातावरणात जगू शकत नाही आणि मासे पुन्हा तलावात सोडल्याने पर्यावरणास हानी होऊ शकते. हे मासे एका नैसर्गिक वातावरणात जगू शकत नाही.

### सुरुवातीला लहान टॅंक निवडा -

हे देखील खरे नाही. काही बायका विचार करतात की त्या नवशिक्या आहे म्हणून लहान टाकीचे एक्वेरियम निवडावे. जर आपण एक छंद म्हणून हे सुरू करत आहात तर लहान टॅंक किंवा टाकी निवडू नये. ह्या टॅंकची निगा राखणे कठीण असते. मोठ्या टॅंकची राखण करणे सोपे असते या मध्ये माशांच्या मृत्यूचे प्रमाण देखील कमी होतील. सोनेरी मासे फिश पात्रा मध्ये ठेवणे वाईट कल्पना आहे लहान पात्रात माशांना फिरायला जागा कमी असते त्यामुळे त्या सहज मरतात.

**तुम्हाला लग्नात फोटो काढायला आवडतं का? असं असेल तर ही बातमी नक्की वाचा. कारण, तुमच्या फोनचा कॅमेरा खराब होऊ शकतो. लोकांना लग्नातील खास क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपायचे असतात, पण तुम्हाला माहित आहे का की, लग्नसमारंभात फोटोग्राफी किंवा व्हिडिओग्राफीमुळे तुमच्या स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याचे कायमचे नुकसान होऊ शकते. याविषयी विस्ताराने माहिती जाणून घ्या.**

# लग्नात फोटो काढताय का? फोन होऊ शकतो खराब, 'या' टिप्स फॉलो करा



तुम्ही लग्नात फोटो काढता का? असं असेल तर ही बातमी नक्की वाचा. कारण, आम्ही तुम्हाला तुमच्या हातून लग्नात नकळत होणारी कॅमेऱ्याची चूक लक्षात आणून देणार आहोत. कारण, यामुळे तुमच्या फोनचा कॅमेरा खराब होऊ शकतो. याविषयी विस्ताराने माहिती जाणून घेऊया.

लग्नात गेलं की आपण फोटो काढण्यापासून स्वतःला रोखू शकत नाही. हे अगदी सर्वांसोबत होतं. अशा प्रसंगी लोक एकत्र येतात, त्यामुळे फोटो मोठ्या प्रमाणात काढले जातात. असे खास क्षण लोकांना आपल्या स्मार्टफोनच्या कॅमेऱ्यात कैद करायचे असतात, पण लग्नसमारंभात फोटोग्राफी किंवा व्हिडिओग्राफीमुळे तुमच्या स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याचे कायमचे नुकसान होऊ शकते हे तुम्हाला माहित आहे का? याविषयी पुढे विस्ताराने वाचा.

लग्नसमारंभात वापरण्यात येणारे लाईट आणि सजावटीची पद्धत बदलली आहे. लग्नसमारंभात बऱ्याचदा चमकदार लाईट, विशेषतः फ्लॅश किंवा लेसर लाईट्सचा वापर केला जातो, ज्यामुळे स्मार्टफोन कॅमेऱ्याचा सेन्सर खराब होऊ शकतो. लेझर लाईट्समध्ये इतकी शक्ती असते की, ते फोनच्या कॅमेऱ्याला कायमचे नुकसान पोहोचवू शकतात. चला जाणून घेऊया कसे.

लग्नसमारंभात हा कॅमेरा खराब होऊ शकतो. लग्नसमारंभात स्मार्टफोनसाठी सर्वात मोठी समस्या येते ती लेझर लाईटच्या वापरामुळे. लेझर लाईट थेट कॅमेऱ्याच्या लेन्सवर पडतो तर सेन्सर बर्न होण्याच्या घटना घडतात. हा प्रकाश सेन्सरला कायमस्वरूपी हानी पोहोचवू शकतो. यानंतर आपल्या फोनसोबत काढलेल्या प्रत्येक फोटोमध्ये हिरवे, केशरी किंवा पांढरे ठिपके किंवा रेषा दिसतात.

कॅमेरा थेट लाईट्सकडे वळवल्यास कॅमेऱ्याची ऑटो-फोकस सिस्टीम बिघडते आणि कधी कधी अंधुक फोटो दिसू लागतात. ऑटो-फोकसला सेट करण्यासाठी अधिक वेळ लागतो.

तेज लाईटच्य संपर्कात आल्याने फोटोंमधील कॉन्ट्रास्ट आणि सॅच्युरेशनचा समन्वय बिघडतो आणि आपल्या फोनमधून क्लिक केलेला प्रत्येक फोटो फिकट होऊ लागतो.

चमकदार लाईट्समुळे वारंवार फोटो क्लिक करणे किंवा व्हिडिओग्राफी केल्याने कॅमेरा सेन्सरची संवेदनशीलता बिघडू शकते. असे झाल्यानंतर फोनची लो-लाईट फोटोग्राफी परफॉर्मन्स बिघडू लागते.

### कॅमेरा खराब होऊ नये यासाठी काय करावे?

हे टाळण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे कॅमेरा लेन्स किंवा फिल्टर वापरणे, जे प्रकाश मंद करतात. याशिवाय स्मार्टफोनकॅमेऱ्याला स्ट्रॉंग लेझर लाईटपासून वाचवणं खूप गरजेचं आहे.

लेझर लाईट्सचे फोटोग्राफी किंवा व्हिडिओग्राफी करण्याची चूक करू नका कारण सेन्सर जळल्यानंतर कळले तर खूप उशीर होईल. जर लाईट्स जास्त असेल तर फोटोग्राफरला तुमचे फोटो क्लिक करण्यास सांगा.

# दूधी भोपळ्याची कोफ्ता करी

**साहित्य** : दुधी भोपळा- १ मध्यम, डाळीचे पीठ, सुके खोबरे- १ वाटी- किसलेले., कांदे- ४, टोमॅटो- २, आले-लसूण-मिरची पेस्ट- २-३ छोटे चमचे, तिखट, मीठ, लसूण- ४-५ पाकळ्या, खसखस- २ चमचे, तीळ- २ चमचे.

**कृती**: सर्वप्रथम दूधी भोपळा किसून घ्यावा. त्यात मीठ आणि आले, लसूण, मिरची पेस्ट घालून ठेवावी. ५ मिनीटे बाजूला ठेवून द्यावे.

तोपर्यंत कढईत खसखस, तीळ हे दोन्ही तेलाशिवाय परतून घ्या. हे मिक्सर मधून वाटून घ्या. कढईत थोडेसे तेल घालून कांदा परतून घ्या. छान गुलाबी झाला की त्यातच सुके खोबरे परतून घ्या. दोन्ही म्हणजे परतलेले कांदा आणि खोबरे मिक्सर मध्ये टोमॅटो व लसूण यांच्या बरोबर छान बारीक वाटण करून घ्या. आत्तापर्यंत दुधी भोपळ्याला पेस्ट मुळे पाणी सुटलेले असेल. त्यात मावेल इतकेच डाळीचे पीठ घाला. आणखी पाणी अजीबात घालू नका नाहीतर कोफ्ते पचपचीत होतात. आता मध्यम आकाराचे कोफ्ते (भजी सारखे) तळून घ्या.



आता कढईत थोडेसे तेल घालून कांदा-खोबयार्चे वाटण परतून घ्या. त्यात तिखट घाला. आता त्यात १ ते १.५ भांडे पाणी घाला. (पाणी केवढे ते आवडीनुसार). आता यात आधी वाटलेले तीळ व खसखस याचे वाटण घाला. आता चवीप्रमाणे मीठ घालून २-३ मिनीटे मस्त उकळी आणा. दूधी भोपळ्याचे कोफ्ते घालून परत एक उकळी आणा. मस्त गरम गरम खा.

# काय आहे मॉईश्चरायझर आणि सिरम?

**बाजारात दर दोन दिवसांनी नवी स्कीन आणि हेअर केअर प्रोडक्ट्स येत असतात. या प्रोडक्ट्सच नेमकं काम काय, हेच आपल्याला कळत नाही. मॉईश्चरायझर असो किंवा सिरम, सगळं सारखचं वाटतं. फेशियल सिरम आणि मॉईश्चरायझरबद्दलही आपला असाच गोंधळ उडतो. या दोघांमधला नेमका फरक जाणून घेऊया...**



- मॉईश्चरायझर लोशन आणि क्रीम अशा दोन्ही प्रकारांमध्ये मिळतो. त्वचेला ओलावा टिकवून ठेवणं हे मॉईश्चरायझरमुळे त्वचा कोरडी पडत नाही. मॉईश्चरायझरमध्ये हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांचं मिश्रण असतं. यामुळे त्वचेला ओलावा टिकून राहतो.
- फेशियल सिरममुळे तुमच्या त्वचेचं पोषण होतं. सिरममुळे तुमचा चेहरा ताजा, टवटवीत आणि तरूण दिसतो. सिरममध्ये 'क' आणि 'ई' जीवनसत्व असतं. तसंच यात अँटी ऑक्सिडंट्सही असतात. सिरममुळे त्वचेला ओलावा टिकून राहतो.
- मॉईश्चरायझरच्या तुलनेत सिरम बरंच हलकं असतं. यात ॲक्टिव्ह म्हणजे कार्यरत घटकांची संख्या बरीच जास्त असते. यातल्या मॉलेक्युल्सचा आकार खूपच लहान असल्याने सिरम त्वचेत पटकन शोषलं जातं. यामुळे त्वचेचं अधिक चांगल्याप्रकारे पोषण होतं.
- सिरममुळे त्वचेचा कोरडेपणा, पिंपल्स, सुरकुत्या पडण्यासारख्या अनेक समस्या दूर होतात. तर मॉईश्चरायझर त्वचेतला ओलावा टिकवून ठवण्याचं काम करतो.
- मॉईश्चरायझरचा वापर दिवस सुरू होताना करायला हवा. तर सिरमचा वापर रात्री झोपताना करायला हवा. अधिक चांगल्या परिणामांसाठी मॉईश्चरायझरच्या आधी सिरम लावता येईल.



# हिंगाचे अन्य गुण

**दक्षिण** भारतामध्ये 'सांबार' या लोकप्रिय प्रकारामध्ये हिंगाचा वापर फक्त जेवणामध्ये रुची निर्माण करणे इतकाच होत नसून औषधनिर्मिती करण्यातही होतो. हिंग हा पदाथार्ला चव प्राप्त करून देणे, फोडणीसाठी उपयोगी पडणे एवढ्याचसाठी नसून औषधरूपाने शरीरामध्ये होणा:या बिघाडांपासून संरक्षण देतो.

हिंग गॅसनाशक आहे, वेदनाशामक आहे, पाचक आहे आणि कृमिनाशकही आहे. या हिंगाचा औषधासाठीचा उपयोग 'चरकसंहिता', 'निघूण्ट', 'रत्नाकर' आदी आयुवेर्दामधील ग्रंथांमध्येही दिला आहे. प्रामुख्याने हिंगाचा अंतर्भाव हिंगाष्टक चूर्ण म्हणून अजीर्णावर मात करण्यासाठीही केला जातो. हे चूर्ण पाव चमचा तुपामधून द्यावे, अजीर्णावर हमखास आराम पडतो. जेवणामध्ये हिंगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. फोडणी देण्यासाठी म्हणून हिंगाची आवश्यकता भासते.

# नॉन-स्टिक भांडी वापरताना 'या' गोष्टी आवर्जून लक्षात ठेवा

**नॉन-स्टिक भांडी तयार करताना 'परफ्लोरो ओक्टॅनॉइक एसिड केमिकल 'चा वापर केला जातो, हे आरोग्यासाठी घातक असे केमिकल आहे.**



हल्ली अनेकजण जेवण तयार करण्यासाठी सर्रास नॉन-स्टिक भांड्याच्या वापर करतात. या भांड्यामध्ये जेवण तयार करताना तेलही कमी लागते आणि एखादा पदार्थ भांड्यांच्या तळाला चिकटतही नाही म्हणून गृहिणींची पसंती नॉन-स्टिक भांड्यांना असते. पण, नॉन स्टीक भांड्याचा जास्त प्रमाणात वापर करणंही आरोग्यास धोकादायक ठरू शकतं. काही नॉन-स्टिक भांडी ही दुय्यम दर्जाच्या कोटींगपासून बनवली असतात त्यामुळे अन्न शिजवताना या कोटींगमधले विषारी घटक शरीरात जाऊन शरीराला धोका निर्माण होण्याची शक्यता असते.

नॉन-स्टिक भांडी तयार करताना 'परफ्लोरो ओक्टॅनॉइक एसिड केमिकल'चा वापर केला जातो, हे आरोग्यासाठी घातक असे केमिकल आहे. वास्तवात नॉन-स्टिक भांड्यामधील ही केमिकल्स स्थिर अवस्थेमध्ये शरीराला घातक नाहीत. मात्र जेव्हा तुम्ही या नॉन-स्टिक भांड्यांना अन्न शिजवण्यासाठी अति-उष्णता देता आणि जेव्हा त्या भांड्याचे तापमान साधारण २६० अंश सेल्सिअस एवढ्या उष्णतेपर्यंत पोहोचते तेव्हा त्यामधील केमिकल्सचे विघटन स- रू होते आणि ते भांडे विषारी वायू फेकू लागते. म्हणून नॉन- स्टिक भांड्यांमध्ये अन्न शिजवता काळजी घेतली पाहिजे.

### नॉन -स्टिक भांड्यात अन्न शिजवण्यापूर्वी घ्यायची काळजी

- ही भांडी वापरताना साबणाच्या कोमट पाण्याने धुऊन आणि कोरडे करून मग वापरावी.
- नॉन- स्टिकची भांडी गरम असताना साफ करू नयेत. कारण या भांड्यावर थंड पाणी पडल्यास त्याच्यावरचं कोटिंग निघून जाण्याची शक्यता असते.
- नॉन-स्टिक भांडी कधीही खसखसून घासू नयेत. त्याचे कोटिंग निघून जाते.
- नॉन-स्टिक भांड्यात अन्न शिजवताना लाकडाच्या चमच्याचा वापर करावा.
- नॉन- स्टिक भांडी धुण्यासाठी स्पंज, नायलॉन स्क्रबर, लिक्विड सोप आणि कोमट पाणी याचा वापर करावा. भांडी साफ करण्यासाठी सोडायुक्त साबण, ब्लीच, तारेचा स्क्रबर यांचा वापर कधीही करू नका.

# लॅपटॉप वापरताना ही काळजी घ्या

**मोबाइल चार्जिंग करताना त्यावर बोलू नये याबद्दलचे भान अनेकांना आले असले तरी इतर गॅजेट हाताळतानाही अशी काळजी घेणे गरजेचे आहे. मोबाईलनंतर सर्वाधिक वापर होणाऱ्या गॅजेटमध्ये लॅपटॉपचा क्रमांक वरचा लागतो. चार्जिंगला लावलेल्या लॅपटॉपवर काम करताना विजेचा झटका लागून मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे घरामध्ये लॅपटॉप वापरताना कोणती काळजी घ्यावी याविषयीच्या खास टीप्स...**

### गादी किंवा उशीवर ठेऊन वापर नको

सर्वच लॅपटॉपच्या खालच्या बाजूला व्हेंटिलेटर्स असतात. लॅपटॉप जर सरळ गादी किंवा उशीसारख्या पृष्ठभागावर ठेऊन काम केल्यास त्यामधील हवा खेळती राहत नाही. यामुळे लॅपटॉप तापतो. काही वेळेस यामुळे आग लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे गादी किंवा उशीवर लॅपटॉप ठेऊन काम करणे टाळावे.

### चार्जिंग सुरु असताना काम नको

कोणत्याही डिजीटल वस्तूला चार्ज करत असताना त्याचा वापर टाळ-ावा. लॅपटॉपवर चार्जिंग सुरु असताना काम करणे अनेक अथार्ने धोकादायक ठरू शकते. अगदी शॉक लागण्यापासून ते छोटा स्फोट होण्यापर्यंत काहीही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच चार्जिंगची पीन काढल्यानंतरच लॅपटॉपचा वापर करावा.

### लॅपटॉप थेट मांडीवर नको

अनेकदा घरात लॅपटॉप वापरताना आपण तो मांडीवर घेतो. त्यातही अनेकदा आपण घरच्या कपड्यांवर म्हणजेच हाफ पॅण्ट किंवा पायजम्यावर असल्यास थेट शरिराशी लॅपटॉपच्या बेसचा संबंध येतो. अशा परिस्थितीत जास्त वेळ काम केल्यास लॅपटॉप तापल्याने चटका बसणे, भाजणे यासारख्या शारिरिक इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे लॅपटॉप थेट मांडीवर घेण्याऐवजी खाली पाट किंवा लाकडी फळी किंवा अगदी रायटिंग पॅड ठेवणे फायद्याचे ठरते.

### जास्त वाकू नका

लॅपटॉप वापरताना सतत मान खाली घालून काम केल्याने मानेचा किंवा पाठीचा कणा दुखण्याचा त्रास होतो. यासाठी उपाय म्हणून लॅपटॉपची स्क्रीन ॲडजेस्ट करणे, किंवा टेबलवर लॅपटॉप ठेऊन काम करणार असला तर लॅपटॉप आणि तुमची बसण्याची लेवल योग्य पद्धतीने ठेवावी. खुर्चीवर बसताना उशी घेणे, खुर्ची टेबल जवळ ठेऊन ९० अंशात हात येतील अशा पद्धतीने ताठ बसून काम करणे योग्य ठरते.



### अंधारात वापर नको

सर्व दिवे बंद करून अंधारात लॅपटॉप स्क्रीनच्या उजेडात काम करणे टाळा. लॅपटॉपमधून निघणारा प्रकाश जास्त वेळ थेट डोळ्यावर पडल्यास डोळ्यांना त्रास होऊ शकतो. मंद उजेडात किंवा पूर्ण उजेडातच लॅपटॉप वापरलेला डोळ्याच्या आरोग्यासाठी योग्य असते.

याशिवाय लॅपटॉपच्या आजूबाजूला खाण्यापिण्याचे पदार्थ न ठेवणे, लॅपटॉपला ॲडिश्नल कि बोर्ड किंवा माऊस लावून तो डेक्सटॉप पीसीसारखा वापरणे, चार्जिंगवरून काढताना थेट चार्जरची वायर न खेचता योग्य पद्धतीने ती काढणे, जास्त वेळ काम करत असल्याचे लॅपटॉप स्क्रीनमुळे डोळ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे यासारख्या गोष्टींमुळे लॅपटॉपचा वापर अधिक सुरक्षित करता येईल.

# लोहाची कमतरता तात्काळ शोधणारी चाचणी विकसित



**भारतीय** संशोधकाचा समावेश असलेल्या एका शास्त्रज्ञांच्या चमूने कमी किमतीत उपलब्ध होणारी रक्तचाचणी विकसित केली असून, त्यामुळे केवळ १५ मिनिटांमध्ये लोह आणि जीवनसत्त्व 'अ' ची कमतरता तपासता येणार आहे.

लहान, सहज हातातून नेण्यासारखी ही निदानसूचक प्रणाली लंचबॉक्सच्या आकारातील असून, यामध्ये रक्तचाचणी पट्टी आहे. मधुमेहाची तपासणी करतात, त्याप्रमाणेच ही चाचणी आहे. जीनवसत्त्व 'अ' आणि लोहाची कमतरता जागतिक लोकसंख्येसमोर मोठा प्रश्न आहे. जगातील एकतृतीयांशपेक्षा अधिक लोकांमध्ये जीनवसत्त्व 'अ' आणि लोहाची कमतरता आहे. यांच्या कमतरतेमुळे अंधत्व, ॲनेमिया (रक्तातील तांबड्या पेशींची कमतरता) आणि मृत्यूही येऊ शकतो. विशेषतः लहान मुले आणि स्त्रियांमध्ये याचा मोठ्या प्रमाणात अभाव जाणवतो. ही आरोग्याची मोठी समस्या असल्याचे, अमेरिकेतील कॉर्नेल युनिव्हर्सिटीचे साहाय्यक प्राध्यापक सौरभ मेहता यांनी सांगितले.

डॉक्टरांनी पोषक घटकांची कमतरता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र या घटकांची कमतरता आहे हे प्राथमिक स्तरावर कळण्यास अवघड जाते. त्याचा शरीरावर मोठा प्रभाव पडतो, असे पीएनएएस या नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनाचे वरिष्ठ लेखक मेहता म्हणाले.

सर्व विकसनशील देशांकडे प्राथमिक स्तरावर रोगनिदान करण्यास आवश्यक असणारी अत्याधुनिक साधणे अपुरी आहेत.

ही समस्या दूर करण्याची क्षमता या चाचणीमध्ये आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, लहान वयातील २५० दशलक्ष मुलांमध्ये जीवनसत्त्व 'अ'ची कमतरता आहे. ज्या भागांमध्ये लहान मुले आणि गर्भवती महिलांमध्ये जीवनसत्त्व 'अ'ची कमतरता आहे, त्या ठिकाणी प्राथमिक तपासणीसाठी ही चाचणी अतिशय फायदेशीर ठरू शकते, असे संशोधकांनी म्हटले आहे. दरवर्षी जवळपास पाच लाख मुले जीवनसत्त्व 'अ' च्या कमतरतेमुळे अंध होतात. आणि त्यातील निम्मी मुले वर्षभरात इतर आजार होऊन मृत्यू पावतात, असे त्यांनी सांगितले.

# हे पदार्थ कधीच एकत्र खाऊ नका

**आहार हा आरोग्यातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. आहार चांगला असेल तर तब्येत चांगली राहण्यास मदत होते. मात्र आहाराचे गणित बिघडले की आरोग्याच्या तक्रारी सुरु होतात. आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश करावा याबाबत आपण अनेकदा ऐकतो आणि वाचतो. मात्र असे काही पदार्थ आहेत जे एकत्रित खाल्ल्यास ते आरोग्यासाठी हानिकारक असतात. वेगाने आणि हळूहळू पचणा-या खाद्यपदार्थांना एकत्र खाल्याने या समस्या येतात. याचे कारण म्हणजे एक पदार्थ लवकर पचतात तर दुसऱ्या पदार्थाची प्रक्रिया सुरु असते. यामुळे शरीरातील काही क्रियांमध्ये अडथळा निर्माण होतो आणि पचनक्रिया बिघडते. आता असे कोणते पदार्थ आहेत जे एकत्र खाल्ल्यास त्रास होऊ शकतो पाहूयात...**



### दूध आणि केळं

शिकरण म्हणून हा पदार्थ आवडीने खाल्ला जातो. मात्र हे दोन पदार्थ एकत्र खाणे तोट्याचे आहे. हे दोन्ही पदार्थ एकमेकांना पचण्यापासून रोखतात. दोघांची पचण्याची वेळ वेगवेगळी आहे. यांना नेहमी एकत्र खाल्याने शरीराची अन्न पचण्याची प्रक्रीया बदलते आणि रात्री नीट झोप न लागण्याची समस्याही उद्भवू शकते.

### काकडी आणि टोमॅटो

सॅलेड म्हणून आपण अनेकदा काकडी आणि टोमॅटो एकत्रित खातो. मात्र यामुळे पोटांचे आजार होऊ शकतात. हे दोन सॅलाड एकत्रित खाल्ल्यास गॅस, ब्लोटिंग, पोटदुखी, थकवा, अस्वस्थ वाटणे अशा समस्या उद्भवू शकतात.

### ब्रेड आणि नूडल्ससोबत ज्यूस

ब्रेड आणि नूडल्सना एकत्र खाल्ल्याने ते महत्त्वाच्या एंजाइमला नष्ट करतात. त्यामुळे शरीराचे अनेक त्रास उद्भवतात. म्हणून हे एकत्र खाणे आरोग्याच्यादृष्टीने घातक आहे.

### टरबूज आणि खरबूज

उन्हाळ्यात साधारण ही दोन्ही फळे मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. याशिवाय सध्या बाहेरही फ्रूटडीशमध्ये ही दोन्ही फळे एकत्रित खाल्याने अपचन आणि पोटाच्या इतर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे हे पदार्थ सोबत खाणे टाळलेलेच बरे.

जनशक्ति
जळगाव जिल्हा
www.ejanshakti.com
जळगाव, शुक्रवार,१७ जुलै २०२६ » पान ३

## शॉर्ट न्यूज

### गणपती नगरातून दुचाकी चोरी ४० हजारांची स्प्लेंडर लंपास

**जळगाव ।** जळगाव शहरातील गणपती नगर परिसरातून उभी असलेली हिरो स्प्लेंडर दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जुलै रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास गणपती नगर परिसरातून हिरो स्प्लेंडर कंपनीची काळ्या रंगाची (एमएच-१८-सीए-८२३६) दुचाकी चोरीस गेली. चोरीस गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे ४० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

### लोखंडी सळईने डोक्यावर वार

**पाचोरा ।** मजुरीचे थकीत पैसे मागितल्याचा राग मनात धरून तीन जणांनी एका मजुराला शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना वरखेडी येथील महासल माता राईस मिलच्या गेटजवळ घडली. या प्रकरणी पिंपळगाव हरेश्वर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरखेडी (ता. पाचोरा) येथील यश रघुनाथ बारी (वय २३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १४ जुलै रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी व त्यांचा मित्र हे राईस मिलमध्ये थकीत मजुरीचे पैसे घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी मिलचे व्यवस्थापक रामकुमार (पूर्ण नाव उपलब्ध नाही) यांनी पैसे न देता शिवीगाळ केली.

# भुसावळ पंचायत समितीवर शिवसेनेचा आज मोर्चा

## ग्रामीण भागातील नागरीकांच्या अडचणी दूर करण्यासाठी मोर्चा

। वरणगाव ✍ प्रतिनिधी।

ग्रामीण भागातील गैरसोई, विजेचा लपंडाव, घरकुल निधी मंजुर असूनही हप्ते न टाकणे, केलेल्या अर्जावरती कार्यवाही न करणे, रोजगार हमी योजनेतून गेलेल्या रकमेची चौकशी न करणे अशा विविध मागण्यांसाठी आज शुक्रवार रोजी भुसावळ पंचायत समिती कार्यालयावर शिवसेनेचा मोर्चा धडकणार आहे.

### भुसावळ पंचायत समिती कार्यालयाच्या माध्यमातून

» **तालुक्यातील** ग्रामीण भागात होणाऱ्या गैरसोई आणि कर्मचारी यांची जनतेच्या कामासाठी होणाऱ्या लपंडावाचा खेळ, घरकुल निधी असून लाभार्थ्यांच्या खात्यावर हप्ते न टाकणे, केलेल्या अर्जावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करणे, रोजगार हमी योजनेतून केलेल्या निधीची चौकशी न करणे, रोजगार हमी योजनेचे पैसे न येणे, घरकुल फोटो काढुनही पैसे जमा होत नाही .आणि फोटो रिजेक्ट होणे केवायसीसाठी गोर गरिबांना चकरा मारण्यास भाग पाडणे या सर्व बाबी लक्षात घेऊन पंचायत समितीच्या विरोधात अशा अनेक प्रश्नांचा जाब विचारून त्यावर तत्काळ निर्णय घेण्यात यावा. यासाठी शुक्रवारी सकाळी १० वाजता पंचायत समिती कार्यालयावर शिवसेनेच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.




**उपमुख्यमंत्री** श्री.एकनाथजी शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री ना.गुलाबराव पाटील, आ.श्री.चंद्रकांत पाटील मुक्ताईनगर यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य जनतेच्या हितासाठी रावेर लोकसभेचे जिल्हा प्रमुख श्री.समाधान महाजन सर व युवा सेना जिल्हाप्रमुख विश्वजीत मनोहर पाटील यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे भुसावळ ग्रामीण, वरणगांव शहर व परीसरातील जनतेने शुक्रवारी सकाळी ठिक १०:०० भुसावळ पंचायत समिती कार्यालयासमोर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सर्व घरकुल लाभार्थी, वरणगांव , भुसावळ ग्रामीण परिसरातील ग्रामस्थ यांनी उपस्थिती द्यावी असे आवाहन शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, अल्पसंख्याक सेना, अनुसुचित जाती – जमाती सेना यांनी आवाहन केले आहे .

# चोपडा शहराच्या विकासाला विरोध नाही...तर वैयक्तिक विकासाला विरोध

## नगराध्यक्षांच्या भूमिकेवर भाजप नगरसेवकांची पत्रकार परिषदेतून टीका!

**चोपडा ।** चोपडा शहराच्या विकासाला आमचा विरोध नसून शहराच्या विकासासाठी आमची सकारात्मक भूमिका आहे.सत्ताधारांच्या वैयक्तिक विकासाला मात्र आमचा विरोध आहे असे भाजपाच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषदेत घेत स्पष्ट केले आहे.चोपडा नगरपरिषदेच्या १० जुलै २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील कामकाज, स्थायी समितीच्या विषयांवरील निर्णयप्रक्रिया, निविदा मंजुरी, करवाढीचा प्रस्ताव तसेच नगराध्यक्षांच्या भूमिकेबाबत चोपडा नगरपरिषदेतील भाजपच्या विरोधी पक्षातील नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आक्षेप नोंदवले. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही सादर केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.दि.१५ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी सांगितले की, सर्वसाधारण सभेदरम्यान सत्ताधारी सदस्यांनी 'आमच्याकडे बहुमत असल्याने सर्व विषय बहुमताने मंजूर' अशी भूमिका घेतली. त्यामुळे कोणत्याही विषयावर चर्चा होऊ दिली नाही. मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविण्यात आले नाही तसेच विद्यमान सभेतील विषयांचेही वाचन करण्यात आले नाही. विषयांचे नियमानुसार वाचन करून त्यावर चर्चा व्हावी, अशी मागणी विरोधी सदस्यांनी लावून धरल्यानंतर सत्ताधारी सदस्य सभागृहातून निघून गेल्याचा आरोप



विरोधी पक्षाकडून करण्यात आला.

नगराध्यक्षांनी पीठासीन अध्यक्ष म्हणून सभेचे कामकाज नियमानुसार चालविण्याबाबत कोणताही निर्णय न देता सभा थेट समाप्त केल्याचा आरोपही विरोधी पक्षाने केला. अशा परिस्थितीत विरोधकांनाच जबाबदार धरणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले.स्थायी समितीच्या ६ जुलै २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील विषयांना विरोध करण्यामागील कारण स्पष्ट करताना विरोधी नगरसेवकांनी सांगितले की, नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या वार्षिक कंत्राटांच्या निविदा दर मंजुरीचे प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात आले होते. मात्र संबंधित प्रस्तावांमध्ये निविदाकारांची नावे नमूद असली तरी त्यांनी भरलेले दर नमूद नव्हते. ऑनलाइन निविदा प्रक्रियेतही दरांची माहिती उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. सर्वसाधारण सभेच्या अजेंडामध्ये कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय बिलांसह जमीन आरक्षणासंदर्भातील ठराव आणि चतुर्थ पंचवार्षिक करवाढीचा प्रस्ताव असल्याचे विरोधी पक्षाने सांगितले. या प्रस्तावानुसार घरपट्टीत २५ टक्के वाढ होण्याची शक्यता असल्याचा दावा करत, अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा न होता सभा संपविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.पुढील सर्वसाधारण सभा पत्रकार, शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि कॅमेऱ्यांच्या उपस्थितीत थेट चित्रित (ऑन कॅमेरा) पद्धतीने घेण्याची मागणीही विरोधी नगरसेवकांनी पत्रकार परिषदेतून केली.

### नगराध्यक्षांनी रबर स्टॅम्प बनू नये

» **नगराध्यक्षांच्या** समोर सर्व सुरू असताना त्यांनी हा निर्णय देणे अपेक्षित होता.पण त्याच दहा मिनिटात सभा समाप्त करून निघाल्या. आणि नंतर चार दिवसांनी विरोधकांनी अरेरावीची भाषा केली असा आरोप करीत आहेत.एखाद्या सदस्यांनी अरेरावीची भाषा केली असती तर त्याच क्षणी विचारलं असतं. परंतु हे नंतर कोणी त्यांना शिकवलं आहे का? असा सवाल करत नगराध्यक्षांनी रबर स्टॅम्प बनू नये असा सल्ला विरोधी नगरसेविका सौ संध्या महाजन यांनी त्यांना दिला. नगराध्यक्षा यांनी स्वतःच्या विवेकाने निर्णय घ्यावेत. तसेच नगरपालिकेच्या प्रत्येक दैनंदिन कामाला विकास काम म्हणणे बंद करावे. प्रत्येक छोट्या गोष्टीत सोशल मीडियावर चमकोगिरी करून नगर परिषदेचा कारभार चालत नाही.तर नगरपरिषद ही नगरपरिषद अधिनियम १९६५ नुसार चालते.

**सौ.संध्या महाजन : भाजप नगरसेविका, न.प.चोपडा**

# घोडगाव केंद्रशाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप; शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश

**चोपडा ।** तालुक्यातील घोडगाव जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा,घोडगाव येथे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. घोडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच माजी भाजप तालुका अध्यक्ष व भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पंकज सुभाष पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजप बूथ प्रमुख भूपेंद्र वाघ आणि ऋषी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सुमधुर स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.यावेळी विद्यार्थ्यांना एस.आय.आर. संदर्भात माहिती देण्यात आली. तसेच शिक्षण हेच यशाचे खरे साधन असून नियमित अभ्यास, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर जीवनात मोठे यश मिळविता येते, असा प्रेरणादायी संदेश मान्यवरांनी दिला. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन आपल्या कुटुंबासह गाव, जिल्हा आणि राज्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.



» **कार्यक्रमास** शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र धनगर, केंद्रप्रमुख हेमंत पाटील,मुख्याध्यापक विलास पाटील यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजशेखर सोनवणे यांनी केले. तर शाळेच्या वतीने रणजितसिंग ठाकूर यांनी उपस्थित मान्यवरांचे व दात्यांचे आभार मानले.शैक्षणिक साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा हा उपक्रम समाजातील दातृत्वाची भावना वृद्धिंगत करणारा ठरला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**जळगाव ।** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित) यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह २६ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत दरवर्षी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच इतर उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांमध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातही उपलब्ध निधीनुसार पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळावी आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा या योजनेमागील प्रमुख उद्देश असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित परीक्षेची गुणपत्रिका, आधार कार्ड, रेशन कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो तसेच आवश्यक इतर कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे. अपूर्ण अथवा आवश्यक कागदपत्रांशिवाय सादर करण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, त्यामुळे अर्ज सादर करताना सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज दि. २६ जुलै २०२६ पर्यंत जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, महाबळ रोड, मायादेवी नगर, जळगाव येथे सादर करावेत. अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली जाणार नसल्याने विद्यार्थ्यांनी अंतिम तारखेपूर्वी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा व्यवस्थापक गोकुळदास जे. पगारे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या या योजनेचा लाभ घेऊन उच्च शिक्षणाचा मार्ग अधिक सुलभ करावा, असे त्यांनी नमूद केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना ही उच्च शिक्षणासाठी महत्त्वाची संधी ठरणार आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून २६ जुलैपूर्वी अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत विविध अशासकीय पदांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

। जळगाव ✍ प्रतिनिधी।

**जिल्हा** सैनिक कल्याण कार्यालय, जळगाव यांच्या अधिपत्याखाली कार्यरत सैनिकी मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह, माजी सैनिक बहुउद्देशीय सभागृह जळगाव व रावेर तसेच माजी सैनिक विश्रामगृह येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर विविध अशासकीय पदे भरण्यात येणार आहेत. या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

भरती प्रक्रियेअंतर्गत सभागृह व्यवस्थापक (पुरुष) - २ पदे, (माजी सैनिक बहुउद्देशीय सभागृह जळगाव व रावेर), वसतिगृह सहायक अधीक्षक (पुरुष) - १पद (मुलांचे वसतिगृह, जळगाव), सफाई कर्मचारी कम एमटीएस (पुरुष) - २ पदे (मुलांचे वसतिगृह - ०१,माजी सैनिक बहुउद्देशीय सभागृह जळगाव - ०१), चौकीदार कम एमटीएस (पुरुष) - ४ पदे (मुलांचे वसतिगृह - १, मुलींचे वसतिगृह - १, माजी सैनिक बहुउद्देशीय सभागृह जळगाव - १ आणि माजी सैनिक बहुउद्देशीय सभागृह रावेर - १) तसेच स्वयंपाकी (महिला) - २ पदे (मुलांचे वसतिगृह - २) अशी पदे भरली जाणार आहेत.

काही पदांसाठी संबंधित ठिकाणी निवासी स्वरूपात २४ तास सेवा देणे आवश्यक असून, पात्र माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी उमेदवारांचा विचार करण्यात येणार असून, स्वयंपाकी पदासाठी माजी सैनिकांच्या पत्नी अथवा विधवांना प्राधान्य दिले जाणार आहे.

अर्जासोबत आधार कार्ड, बँक पासबुक, रहिवासी दाखला, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो तसेच माजी सैनिक उमेदवारांनी ओळखपत्र व डिस्चार्ज बुकची प्रत जोडणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जळगाव येथे सादर करावेत. पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि. २४ जुलै २०२६ रोजी घेण्यात येणार आहेत.

# चोपडा आगारात एसटीच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त वृक्षारोपण

**चोपडा ।** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यभर राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण अभियानाच्या पार्श्वभूमीवर चोपडा आगारातही उत्साहपूर्ण वातावरणात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाचा शुभारंभ चोपडा नगराध्यक्षा सौ. नम्रता पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आगार परिसरात विविध प्रकारच्या सावली व फळझाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपणाची गरज अधोरेखित करत उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्पही



केला.यावेळी नगराध्यक्षा सौ. नम्रता पाटील यांनी एसटी महामंडळाच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक करत, प्रत्येक नागरिकाने वर्षातून किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास सहायक कार्यशाळा अधीक्षक सिद्धार्थ चंदनकर, स्थानक प्रमुख अनिकेत न्हायदे, नितीन सोनवणे, सचिन पाटील, शाम धामोळे, भगवान न्हायदे, रिना पाटील, जयश्री परदेशी, महेश बिरारी, नरेंद्र जोशी, उमेश चौधरी तसेच आगारातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाबार्ड च्या ४५ व्या दिनानिमित्त नाबार्ड व दि जळगाव पीपल्स कोऑपरेटीव बँकेतर्फे

## शाश्वत शेती व पुरक उद्योगात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या महिला शेतकऱ्यांचा सत्कार

**जळगाव ।** दि जळगाव पीपल्स कोऑपरेटीव बँक ही अग्रगण्य सहकारी बँक असून बँकेस ९३ वर्षांची गौरवशाली परंपरा आहे. बँकेशी संलग्नित २००० पेक्षा जास्त बचत गट असून त्यांना जवळपास रु ३०.०० कोटीपेक्षा जास्त कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. नाबार्ड च्या अमुल्य सहकार्याने, बँक बचत गटांसाठी आर्थिक स्वावलंबनास प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित करित असते. नाबार्ड चा ४५ वा स्थापना दिवस दि. १२ जुलै निमित्त, उशश्रशलीरींळपस ींहश लेपीींळलींळेप ेष थेशप ऋीशीी ळप डीींरळपरलश्रश -सीळलीश्रींीश या संकल्पनेस अनुसरुन आज बुधवार रोजी दि.१५ जुलै २०२६ रोजी यशवंतराव मुक्तांगण, जळगाव येथे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. याअंतर्गत पशुपालन महिला बचत गटाच्या मा.सौ.सपनाताई चंद्रकांत पाटील-आडगाव, धनलक्ष्मी महिला बचत गटाच्या मा.सौ.अरुणाताई किशोर पाटील - नशिराबाद आणि साहस महिला बचत गटाच्या मा.श्रीमती कल्पनाताई गणेश वराडे-जळगाव यांना शाश्वत शेती व पुरक उद्योगात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल गौरविण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले.



» **सदर** सत्कार ठडएढख चे संचालक मा.श्री.सत्यनारायणजी लालदास, बिनाईन क्राफ्ट चे प्रोप्रायटर मा.श्री.प्रफुल्लजी पाटील, मा.श्री.अमितजी तायडे–जिल्हा विकास प्रबंधक नाबार्ड, बँकेच्या संचालिका मा.सौ. ज्योत्स्नाताई बऱ्हाटे व बचत गट मुख्य व्यवस्थापक सौ.शुभश्रीताई दप्तरी यांच्या हस्ते करण्यात आला. प्रमुख अतिथी मा.श्री.सत्यनारायणजी लालदास यांनी महिलांसाठी उपलब्ध असलेल्या प्रशिक्षणांबद्दल माहिती दिली. मा.श्री.प्रफुल्लजी पाटील यांनी केळीच्या फायबर पासून बनविण्यात येणाऱ्या विविध उत्पादनांची प्रक्रिया सांगितली, तसेच डिजीटल माध्यम मार्केटींगसाठी कसे उपयुक्त ठरते, हे विषद केले. मा.श्री.अमितजी तायडे यांनी नाबार्डचा ४५ वर्षांचा गौरवशाली प्रवास मांडला व शेती तसेच महिला सक्षमीकरणासाठी उपलब्ध सुविधांचा लेखाजोखा मांडला. तसेच मा.सौ.अर्चनाताई महाजन यांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांनी चू ठळसहीं–चू झरव या प्रकल्पाबाबत माहिती दिली.तसेच महिला बचत गट सदस्यांसाठी लोणचे पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याकरिता मा.सौ. आरती सणस या परिक्षक होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बँकेच्या बचत गट सहयोगिनी मा.सौ. अंजलीताई बोरसे आणि आभार प्रदर्शन सहयोगिनी मा.सौ. शारदाताई ठाकुर यांनी केले.

# किमान आधारभूत किंमतीत ज्वारी खरेदीस मुदतवाढ

## पणन महासंघाचे राज्य अध्यक्ष रोहित निकम यांच्या प्रयत्नांना यश

। चोपडा ✍ प्रतिनिधी।

राज्यातील शेतकरी बांधवांच्या आग्रही मागणीचा विचार करून ज्वारी खरेदीची अंतिम मुदत वाढवून मिळावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष रोहित निकम, सर्व संचालक मंडळ आणि प्रशासनाने राज्य व केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर मोठे यश आले असून, केंद्र व राज्य शासनाने ज्वारी खरेदीच्या मुदतीत वाढ करण्याचा अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे.

यामुळे आता राज्यातील शेतकरी बांधवांना किमान आधारभूत किमतीवर (एम. एस.पी) आपली ज्वारी विक्री करण्यासाठी आणखी एक संधी उपलब्ध झाली असून, ही मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.यावर्षी राज्यात ज्वारीचे लागवड क्षेत्र लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. मात्र, खुल्या बाजारात ज्वारीचे दर कमालीचे घसरल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत होता. अनेक भागांत शेतकऱ्यांना नाईलाजास्तव किमान आधारभूत किमतीपेक्षा अत्यंत कमी दराने ज्वारी विकावी लागत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. या मुदतवाढीमुळे आता शेतकऱ्यांना हक्काचा शासकीय दर मिळण्यास मदत होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पणन महासंघाचे अध्यक्ष रोहित निकम व संचालक मंडळाने केंद्र सरकारकडे विशेष विनंती केली होती.केंद्र शासनाने त्यास अधिकृत मंजुरी दिली आहे. मंत्रालयातून या संदर्भातील अधिकृत आदेश प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानुसार, खरेदी प्रक्रिया राबवताना केंद्र सरकारच्या पत्रातील सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील, अशी माहिती जळगावचे जिल्हा पणन अधिकारी एस.एस.मेने यांनी दिली आहे.



» **शेतकरी** बांधवांची अडचण ओळखून आम्ही राज्य आणि केंद्र सरकारकडे मुदतवाढीसाठी सातत्याने पाठपुरावा करत होतो. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे. खुल्या बाजारात दर कमी असले, तरी शेतकऱ्यांनी घाबरून न जाता शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीवरच (एम. एस.पी) आपली ज्वारी विकावी.राज्यातील एकाही शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी पणन महासंघ कटिबद्ध आहे.

**रोहित निकम**
**अध्यक्ष,** महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ

## संपादकीय

# त्यांचे म्हणणे ऐका

सोनम वांगचुक यांच्या उपोषणामुळे सर्व देश नाही, तरी या देशातला विचारी समाज नक्कीच चिंतेत आहे. उपोषणाच्या सोळाव्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली. त्यांचा जीव मोलाचा आहे, तो त्यांनी पणाला लावू नये अशी सार्वत्रिक भावना व्यक्त झाली. सामाजिक व राजकीय क्षेत्रातले कार्यकर्ते तर बोललेच, पण झीनत अमान, ओमी वैद्य वगैरेंसारख्या चित्रपट कलावंतांनीही अनपेक्षितपणे त्यांना पाठिंबा दिला. यावरून हा विषय किती विविध थरात झिरपलेला आहे याची कल्पना यावी. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा ही मागणी घेऊन दिल्लीतील जंतरमंतरवर गेली चोवीस दिवस कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन चालू आहे. याला मोदी सरकारने आजतागायत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. हे त्यांच्या गेल्या बारा वर्षातील राजकीय संस्कृतीला साजेसे आहे. विरोधकांच्या मागणीपुढे आपण झुकलो असे कोणत्याही स्थितीत दिसता कामा नये, असा मोदी सरकारचा पण आहे. आपल्या विरोधातील आंदोलकांशी चर्चा करणे हेदेखील ते कमीपणाचे मानतात. हा संसदीय लोकशाहीला अत्यंत घातक असा पवित्रा आहे. भाजप एरवी वारंवार आणीबाणीवरून काँग्रेसवर टीका करीत असतो. पण अगदी ऐन आणीबाणीच्या काळातही इंदिरा गांधी यांनी जयप्रकाश नारायण व इतर नेत्यांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संवाद कायम ठेवला होता हे लक्षात ठेवायला हवे. यापूर्वी लडाखमध्ये वांगचुक यांनी केलेले उपोषण व त्या प्रश्नासाठी दिल्लीपर्यंत काढलेली यात्रा यांच्याकडेही मोदी सरकारने असेच दुर्लक्ष केले होते. यावेळी वांगचुक हे कॉकरोच पार्टीच्या मंचावर आहेत. ही पार्टी म्हणजे तर कालपरवाच्या तरुणांचा गट आहे. शिवाय त्यांच्यामागे प्रचंड म्हणावा असा जनसमुदाय उभा राहिलेला नाही. पंजाब व हरियाणातील शेतकरी समाज व त्यांच्या संघटना बलिष्ठ आहेत. त्यांनी दिल्लीमध्ये जवळपास दीड वर्षे ठिय्या आंदोलन करूनही मोदींनी त्यांना दाद दिली नव्हती. उलट त्यांना खलिस्तानवादी ठरवण्याचा प्रयत्न केला होता. मोदी सरकार कॉकरोच पार्टी व तिची आंदोलने यांच्यावरही देशविरोधी असल्याचे आरोप झाले आहेतच. पण तरुण व त्यातही नीटची परीक्षा देणारे मध्यमवर्गीय तरुण हा कॉकरोच यांचा पाठिंबादाता असल्याने मोदी सरकार थोडी सावध पावले टाकत आहे. त्यामुळेच त्यांना आंदोलनाला परवानगी मिळाली व त्यांच्या नेत्यांवर पोलिसी वगैरे कारवाया झालेल्या नाहीत. मात्र आता मोदी सरकारने आणखी पुढचे पाऊल टाकायला हवे. वांगचुक व आंदोलकांशी चर्चा करायला हवी. नीट परीक्षेत गैरव्यवहार करणाऱ्यांवर कडक कारवाई होईल व यापुढे असे प्रकार होणार नाहीत हे आंदोलकांना पटवून द्यायला हवे. दुर्दैवाने जनतेला विश्वासात घेणे हा प्रकारच या भाजप सरकारच्या काळात घडत नाही. नीट पेपरफुटीच्याच काळात सीबीएसईच्या ऑनलाइन पेपर तपासणीचा घोटाळा उघड झाला. एका काळ्या यादीतील कंपनीला कंत्राट दिले गेले असे निष्पन्न झाले. मात्र सरकारने याबाबत आजतागायत स्पष्ट खुलासा केलेला नाही. अर्थात याला दुसरीही बाजू आहे. याचा फटका ज्यांना बसला ते विद्यार्थी व त्यांचे पालक या प्रश्नावर सोशल मीडियातून बोलले. सरकारवर तिथे मोठी टीका झाली. पण आज त्याच प्रश्नावरून वांगचुक यांनी उपोषणाचे अस्त्र उपसलेले असताना त्यांना पाठिंबा द्यायला यांच्यातले फारच थोडे लोक जंतरमंतरवर पोचले आहेत. शिवाजी जन्माला यावा, पण तो शेजारच्या घरात अशी ही वृत्ती आहे. यामुळेच मोदी सरकारच्या अनेकविध धोरणांबाबत नाराजी असली तरी एकही ठोस आंदोलन उभे राहू शकलेले नाही. एकीकडे उदासीन किंवा कातडीबचावू समाज आणि दुसरीकडे निष्ठुर सरकार अशी स्थिती असल्याने वांगचुक यांच्यासारख्यांनी आपल्या आंदोलनाची दिशा नव्याने ठरवायला हवी. वांगचुक हे नामांकित शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरण रक्षणासाठी काम करणारे कार्यकर्ते आहेत. तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रात त्यांच्याकडे अनेक पेटंट्स आहेत. आपल्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांनी भारतीय लष्करासाठीही उपयुक्त साधने बनवली आहेत. असा नेता जेव्हा तळमळीने एखाद्या प्रश्नावर काही भूमिका मांडतो तेव्हा त्याकडे सरकार व समाज यांनी तत्परतेने व सजगपणे पाहायला हवे. पण सध्या हरेक गोष्टीचे राजकीयीकरण झाले आहे. त्यामुळे अमुक माणूस भाजपविरोधक आहे की बाजूचा इतक्याच मर्यादित दृष्टिकोनातून पाहिले जाते. गंमत म्हणजे एकीकडे भाजप सरकार वांगचुक यांचे म्हणणे ऐकायला तयार नसताना, विरोधकांपैकी काही जण त्यांना भाजपचे छुपे साथीदार मानत आहेत. म्हणूनच बहुदा काँग्रेस व राहुल गांधी आजवर या आंदोलनाला पाठिंबा देणे टाळले आहे. पण यात, वांगचुक आणि कॉकरोच पार्टी ज्या प्रश्नांसाठी भांडत आहेत ते बाजूला पडत आहेत. हे होणे अयोग्य आहे.

> **भाजप सरकार वांगचुक यांचे म्हणणे ऐकायला तयार नसताना, विरोधकांपैकी काही जण त्यांना भाजपचे छुपे साथीदार मानत आहेत. म्हणूनच बहुदा काँग्रेस या आंदोलनाला पाठिंबा देणे टाळले आहे. वांगचुक आणि कॉकरोच पार्टीचे मुद्दे दुर्लक्षित व्हायला नको.**

## मनन चिंतन

ह.भ.प. देवदत्त परुळेकर



### धन हाच सेवक

**धनवंता घरीं । करी धनचि चाकरी ॥**

तुकाराम महाराजांची ही ओळ पहिल्यांदा वाचली की थोडी गमतीशीर वाटते. पण विचार केला तर तिच्यात जीवनाचा मोठा नियम दडलेला आहे. खरा धनवान तो नसतो ज्याच्याकडे पैसा असतो; खरा धनवान तो असतो जो पैशाचा योग्य उपयोग करायला जाणतो. अशा व्यक्तीकडे पैसा स्वतःहून येतो, वाढतो आणि त्याची सेवा करतो. याचे एक सुंदर उदाहरण म्हणजे पीटर लिंच नव्हे, तर जगप्रसिद्ध गुंतवणूकदार यांच्या जीवनात दिसते. पीटर लिंच हे अमेरिकेतील सर्वात यशस्वी गुंतवणूकदारांपैकी एक मानले जातात. पण त्यांचे यश एका रात्रीत आले नव्हते. लहानपणी त्यांनी एका गोल्फ क्लबमध्ये काम केले. त्यांचे काम होते चेंडू उचलणे आणि लहानमोठी कामे करणे. अनेक जण पहिला पगार मिळाला की तो खर्च करण्याचा विचार करतात. पण पीटर लिंच वेगळा विचार करत होते. त्यांनी पैशाकडे खर्चाची वस्तू म्हणून नाही, तर काम करणारा नोकर म्हणून पाहिले. ते म्हणत, ''आज मी हा पैसा खर्च केला तर तो संपेल. पण गुंतवला तर तो माझ्यासाठी काम करेल.'' हळूहळू त्यांनी बचत केली. अभ्यास केला. कंपन्यांचा शोध घेतला. योग्य ठिकाणी गुंतवणूक केली. वर्षानुवर्षे संयम ठेवला. परिणाम असा झाला की एकेक डॉलर त्यांच्यासाठी काम करू लागला. त्या पैशातून आणखी पैसा निर्माण होऊ लागला. जणू धनच त्यांच्या घरी चाकरी करू लागले. आपल्या आसपासही आपण हे पाहतो. दोन मित्रांना समान पगार मिळतो. एकजण प्रत्येक महिन्यात सर्व पैसा खर्च करतो. दुसरा थोडी बचत करतो, नवीन कौशल्य शिकतो, योग्य ठिकाणी गुंतवणूक करतो. दहा वर्षांनी दोघांच्या आर्थिक परिस्थितीत मोठा फरक दिसतो. फरक उत्पन्नात नसतो; फरक पैशाशी असलेल्या नात्यात असतो. पीटर लिंच यांनी पैशाचा गुलाम होणे स्वीकारले नाही. त्यांनी पैशाला स्वतःचा सेवक बनवले. म्हणून त्यांचे धन वाढत गेले. तुकाराम महाराजांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. पैसा वाईट नाही आणि पैसा महानही नाही. तो एक साधन आहे. जो त्याचा शहाणपणाने उपयोग करतो, त्याच्यासाठी पैसा काम करतो. जो विचार न करता पैसा खर्च करतो, तो पैशाचा नोकर बनतो. म्हणून खरी श्रीमंती बँकेतील आकड्यांत नसते. ती विवेक, संयम आणि दूरदृष्टीमध्ये असते. ज्याच्याकडे हे गुण असतात, त्याच्या घरी धन स्वतः चाकरी करायला येते.



## देश-विदेश



भावेश ब्राह्मणकर

# भीषण भूकंपानंतरचा व्हेनेझुएला

**व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना अमेरिकेने ताब्यात घेतले आणि काही महिन्यांनी सलग दोन भूकंप आले. व्हेनेझुएलात सध्या अत्यंत हृदयद्रावक स्थिती आहे. त्याची कल्पनाही कुणी केली नसेल असे सारे घडते आहे.**

काही महिन्यांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांना सुचवले की, त्यांनी कायमचे व्हेनेझुएलाची राजधानी कारकास येथे स्थायिक व्हावे. कारकास हे तेच ठिकाण आहे, जिथे अमेरिकन कमांडोंनी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना त्यांच्याच बेडरूमचा दरवाजा तोडून अटक केली होती. ट्रम्प यांनी हसत हसत रुबियो यांना व्हेनेझुएलाचे पुढील नेते बनण्याची ऑफर दिली. राष्ट्राध्यक्षांच्या सल्लागारांच्या मते तो एक विनोद होता, पण आजचे वास्तव हे आहे की, रुबियो हे वॉशिंग्टनमध्ये बसूनच पूर्ण व्हेनेझुएलावर नियंत्रण ठेवत आहेत. ते व्हेनेझुएलाचे अघोषित व्हाइसरॉय (सुभेदार) आहेत.

२००३ मध्ये अमेरिकेने इराकवर ताबा मिळवला तेव्हा एल. पॉल ब्रेमर यांनी ज्या प्रकारे बगदाद चालवले होते, त्यानंतर कोणत्याही अमेरिकन अधिकाऱ्याने दुसऱ्या सार्वभौम देशावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्याची ही पहिलीच वेळ आहे. रुबियो सध्या व्हेनेझुएलाची अर्थव्यवस्था, तिथली नैसर्गिक संसाधने आणि सरकारची धोरणे पूर्णपणे नियंत्रित करत आहेत. मात्र, गेल्या महिन्यात झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर आता शोधमोहीम संपून पुनर्वसनाचा टप्पा सुरू झाला असताना, या अमेरिकन हुकूमशाही राजवटीला जनतेच्या तीव्र असंतोषाचे मोठे तडे जाऊ लागले आहेत.

मादुरो यांचा ताबा घेऊन सहा महिने उलटले आहेत. रुबियो यांनी एकदाही तिथे प्रत्यक्ष भेट दिलेली नाही. तरीही, ते देशाच्या दैनंदिन कामकाजात अत्यंत बारकाईने लक्ष घालत आहेत. मादुरो यांच्या राजवटीत उपराष्ट्राध्यक्ष असलेल्या आणि सध्या अमेरिकेच्या संमतीने व्हेनेझुएलाचे हंगामी नेतृत्व करणाऱ्या डेल्सी रॉड्रिग्ज यांच्याशी रुबियो सतत संपर्कात असतात. रुबियो आणि रॉड्रिग्ज यांच्यातील हा संपर्क कोणत्याही भागीदारीचा नसून, ट्रम्प कालीन 'बळी तो कान पिळी' या अमेरिकन शक्तीचे थेट प्रदर्शन आहे. इथे सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांना बाजूला सारून अमेरिकेने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

आज व्हेनेझुएलाच्या बहुतांश निर्यातीतून मिळणारा महसूल थेट अमेरिकेच्या तिजोरीत जमा होतो. त्यानंतर अमेरिका हा पैसा व्हेनेझुएलाच्या बँकिंग प्रणालीद्वारे तिथल्या सरकारला वितरीत करते. ही व्यवस्था एखाद्या पालकाने आपल्या मुलांना पॉकेट मनी देण्यासारखी आहे. हा पैसा कुठे खर्च करायचा, कोणी खर्च करायचा आणि कोणत्या अटींवर खर्च करायचा, हे मार्को रुबियो आणि त्यांची टीम ठरवते. या व्यवस्थेचा एक फायदा व्हेनेझुएला सरकारला नक्कीच झाला आहे, तो म्हणजे अब्जावधी डॉलर्सच्या थकीत कर्जासाठी जे आंतरराष्ट्रीय क्रेडिटर्स त्यांच्या मागे लागले होते, त्यांच्यापासून अमेरिकन ट्रेझरीच्या संरक्षणामुळे सरकारचा बचाव झाला आहे. मात्र, यामुळे डेल्सी रॉड्रिग्ज यांच्यावर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे, कारण सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी आणि देशाचे चलन स्थिर ठेवण्यासाठी त्यांना संपूर्णपणे अमेरिकेच्या पैशावर अवलंबून राहावे लागत आहे.

रुबियो केवळ आर्थिक नाड्यांवरच नियंत्रण ठेवून नाहीत, तर व्हेनेझुएलातील अंतर्गत नियुक्त्यांमध्येही त्यांचा थेट हस्तक्षेप आहे. अमेरिकेने घातलेल्या निर्बंधांमधून कोणत्या परदेशी कंपन्यांना सूट द्यायची, याचे परवाने स्वतः रुबियो यांचे कार्यालय तयार करते. त्यांनी व्हेनेझुएलाच्या तेल क्षेत्रात युरोपियन कंपन्यांना बाजूला सारून अमेरिकन कंपन्यांना प्राधान्य दिले आहे. ऊर्जा मंत्री ख्रिस राइट यांच्यापेक्षाही रुबियो यांचा तेल क्षेत्रावर जास्त प्रभाव दिसून येतो. अमेरिकेने व्हेनेझुएलाला रशिया किंवा चीनसारख्या आपल्या प्रतिस्पर्धी देशांसोबत व्यापार न करण्याचा सक्त इशारा दिला आहे. परिणामी, व्हेनेझुएलाच्या सरकारी तेल कंपनीने रशियाच्या रोसनेफ्ट या सरकारी कंपनीसोबतचे संयुक्त प्रकल्प हळूहळू आपल्या ताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे. इतकेच नव्हे, तर फेब्रुवारी महिन्यात मादुरो यांचे व्यावसायिक भागीदार ॲलेक्स साब यांना ताब्यात घेऊन अमेरिकेकडे सोपवण्यात आले. व्हेनेझुएलाचे परराष्ट्र धोरणही वॉशिंग्टनच ठरवते. रॉड्रिग्ज यांच्या भारत दौऱ्याची सर्वप्रथम घोषणा रुबियो यांनी केली.

गेल्या महिन्यात व्हेनेझुएलामध्ये झालेल्या दोन भीषण भूकंपांनी अमेरिकेचे सर्व राजकीय डावपेच धुळीस मिळवले आहेत. संपूर्ण परिसर उद्ध्वस्त झाले असून अधिकृत मृतदेहांचा आकडा ३,५०० च्या पार गेला आहे, तर प्रत्यक्ष संख्या यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असण्याची शक्यता आहे. या नैसर्गिक आपत्तीने व्हेनेझुएलाच्या नागरिकांमध्ये अनेक वर्षांपासून दबलेला तीव्र असंतोष आणि अन्यायाची दरी पूर्णपणे उघडी केली आहे.

भूकंपाचा सर्वाधिक फटका बसलेल्या 'ला ग्वेरा' या उत्तर किनारपट्टीच्या प्रांतात शोकाकुल आणि संतप्त नागरिकांनी पोलीस आणि नॅशनल गार्डच्या जवानांना अक्षरशः पळवून लावले आहे. एका कोसळलेल्या विशाल सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पाच्या ढिगाऱ्याजवळ, जिथे ७०० हून अधिक कुटुंबे राहत होती, तिथे ४७ वर्षांचे जोस सिल्वा एका कट्ट्यावर बसून घाम पुसत होते. सलग १० दिवस आपल्या हाताने सिमेंटचे स्लॅब उपसून मृतदेह काढणाऱ्या सिल्वा यांचा राग अनावर झाला होता. ते म्हणाले, ''आता मला कसली भीती असणार? पोलीस फक्त त्यांच्या स्वतःच्या लोकांचे जीव वाचवत आहेत. सरकारने आम्हाला कचऱ्यासारखी दुय्यम दर्जाची साधने दिली. जर मी मरण्यासाठीच जन्मलोय, तर सत्य बोलण्यास का घाबरू?''

३९ वर्षांच्या किंबर्ली लिओन आपल्या ९ आणि १३ वर्षांच्या निष्पाप मुलांचा शोध घेत आहेत. त्या म्हणाल्या, ''भूकंप झाल्यावर पोलीस आले, त्यांनी नेहमीप्रमाणे व्हिडिओ शूटिंग केले आणि निघून गेले. आम्ही मशिन्सना थांबवण्याचा प्रयत्न केला, पण त्या मशिन्स सामान्य लोकांच्या घरांकडे न जाता पैशावाल्यांच्या खाजगी इमारतींकडे निघून गेल्या.'' सध्या ला ग्वेरामध्ये सर्वात मौल्यवान गोष्ट कोणती असेल, तर ती म्हणजे शांतता. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचे आवाज ऐकण्यासाठी बचावकर्ते हवेत हात उंचावून सर्वांना शांत राहण्याचे आवाहन करतात. अशाच एका सायलेन्ट झोनमधून जेव्हा गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची गाडी सायरन वाजवत गेली, तेव्हा संतप्त नागरिकांनी त्या गाडीवर दगडफेक करत अधिकाऱ्यांना शिवीगाळ केली.

व्हेनेझुएलाच्या सरकारी सोशल मीडियावरून हाय-टेक बचाव मोहिमांचे व्हिडिओ शेअर केले जात आहेत, पण प्रत्यक्ष जमिनीवर सामान्य नागरिक साध्या टी-शर्ट आणि चपला घालून, उघड्या हाताने आपल्या नातेवाईकांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून काढत आहेत. धूळ आणि मृतदेहांच्या दुर्गंधीपासून वाचण्यासाठी त्यांच्याकडे साधे मास्कही नाहीत. त्यातच, रॉड्रिग्ज या आपत्तीग्रस्त भागाच्या पाहणीसाठी इटालियन लक्झरी ब्रँड 'मॉन्क्लर'चे महागडे स्की जाकीट घालून आल्याने त्यांच्यावर तीव्र टीका होत आहे.

फिलिपिन्स वसाहत सोडल्यानंतर तब्बल ८० वर्षांनी अमेरिका पुन्हा एकदा वसाहतवादी मानसिकतेकडे वळताना दिसत आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी व्हेनेझुएलाला अमेरिकेचे ५१ वे राज्य बनवण्याचे संकेतही दिले आहेत. परंतु, या आपत्तीने व्हेनेझुएलात पुन्हा एकदा २०२४ सारख्या लष्करी दडपशाहीची भीती निर्माण केली आहे. गेल्या आठवड्यात विल्मर क्रूझ नावाच्या स्वयंसेवकाला सरकारी अनागोंदीचा व्हिडिओ बनवला म्हणून अटक करण्यात आली होती, ज्याला दबावानंतर सोडावे लागले.

जर रॉड्रिग्ज सरकारने स्वतःचे अपयश लपवण्यासाठी जनतेवर अत्याचार सुरू केले, तर स्वतःला लोकशाहीचे कैवारी म्हणवणारे अमेरिका आणि परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो कोणती भूमिका घेणार? व्हेनेझुएलाचे तेल मिळवण्याच्या नादात अमेरिका एका संपूर्ण देशाच्या मानवाधिकारांचा बळी देत आहे. याच धोरणावर रुबियो यांचे अमेरिकेतील राजकीय भविष्य अवलंबून असणार आहे.

bhavbrahma@gmail.com
संरक्षण, सामरिकशास्त्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी, परराष्ट्र संबंध अभ्यासक आणि मुक्त पत्रकार

## कालप्रवाह

# रेल्वेलगतच्या बांधकामाबाबत उशिराचे शहाणपण

**प्रवाशांची वाढती संख्या आणि लोकल फेऱ्यांचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी मोकळी जमीन उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक ठिकाणी रेल्वे रुळांच्या अगदी जवळ असलेल्या वस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढतो.**

रेल्वे जमिनीच्या सीमेपासून ३० मीटरच्या आत कोणतेही नवीन बांधकाम करण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे मध्य रेल्वेने बंधनकारक केले आहे. पूर्वपरवानगीखेरीज केलेले कोणतेही बांधकाम अनधिकृत मानले जाईल, असा इशारा रेल्वेनी दिला. अशा बांधकामांना नुकसानभरपाईचा लाभ मिळणार नाही. रेल्वे बोर्डाच्या २५ जून २०१५ च्या आदेशानुसार तसेच युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल अँड प्रमोशन रेग्युलेशन मधील तरतुदीनुसार रेल्वे जमिनीपासून ३० मीटरच्या आता बांधकामाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. गेल्या काही दिवसांत मध्य रेल्वेच्या रेल्वे मार्गालगत बांधकामे वाढत असून जमिनीची मालकी माझी असल्याने मी कुठलेही ना- हरकत प्रमाणपत्र घेता बांधकाम करून मोकळा होणार, अशी प्रवृत्ती वाढीस लागली आहे. त्यामुळे अशी बांधकामे करणाऱ्यांना जाणीव करून देण्याकरिता हे आदेश पुन्हा जारी केले. अर्थात मुंबई व उपनगरात मध्य रेल्वेच्या मार्गालगत यापूर्वीच वर्षानुवर्षापूर्वी बांधकामे झाली. अगोदर कच्ची झालेली बांधकामे कालांतराने पक्की करून ती दुमजली केली गेली. आता या बांधकामांवर कारवाई करणे मुश्कील झाले आहे. गेल्या काही वर्षांत मध्य रेल्वेने रेल्वे मार्गालगतच्या भिंतींची उंची वाढवली. जेथे भिंती तोडून येण्याजाण्याकरिता मार्ग तयार केले होते ते बंद केले. ब्रिटीशांनी त्या काळात रेल्वेमार्गाकरिता संपादीत केलेल्या जमिनीमुळे रेल्वेचे जलद व धीमे डाऊन व अप मार्ग सुरु आहेत. पाचवा व सहावा रेल्वेमार्ग उभारताना मध्य रेल्वेला किती यातायात करावी लागली ते सर्वश्रूत आहे. टप्प्याटप्प्याने जसे जमेल तसे हे मार्ग टाकले गेले. अजूनही कुर्ला ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान पाचवा व सहावा मार्ग टाकणे शक्य झालेले नाही. अर्थात त्याचे कारण येथे रेल्वे मार्गालगत जागा शिल्लक नाही. मध्य व पश्चिम रेल्वेच्या मार्गालगत हजारो बांधकामे उभी आहेत. रेल्वे अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत ही बांधकामे उभी राहिली. स्थानिक आमदार, खासदार व नगरसेवक यांच्याकरिता या मतपेढ्या असल्याने त्यांनी रेल्वे मार्गालगतच्या बेकायदा बांधकामांना संरक्षण दिले. वांद्रे येथे रेल्वे मार्गालगतच्या शेकडो बेकायदा झोपड्यांवर अलीकडेच कारवाई केली गेली. यावेळी झोपडपट्टीवासीयांनी पथकावर हल्ला केला होता. वांद्रे येथील या झोपड्यांवर यापूर्वीही कारवाई केली होती. मात्र कारवाईनंतर मोकळी झालेली जमीन राखण्यात पश्चिम रेल्वेला यश आले नाही.

रेल्वे प्रशासनाच्या या भूमिकेमुळे आता अनधिकृत बांधकामांना चाप बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. वास्तविक पाहता, मुंबई व परिसरातील रेल्वे मार्गांचा विस्तार करताना अनेक कायदेशीर व तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आणि भविष्यातील रेल्वे प्रकल्पांचे नियोजन लक्षात घेऊन हे नियम अधिक कडक करण्यात आले आहेत. प्रवाशांची वाढती संख्या आणि लोकल फेऱ्यांचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी मोकळी जमीन उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक ठिकाणी रेल्वे रुळांच्या अगदी जवळ असलेल्या वस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढतो, तसेच रेल्वेच्या गाड्यांचा वेगही मर्यादित ठेवावा लागतो. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने हा आक्रमक पवित्र घेतला आहे.

भविष्यात अशा प्रकारच्या सर्व अतिक्रमणांवर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत रेल्वेने दिले आहेत. पालिका प्रशासन आणि स्थानिक पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने रेल्वे जमिनींचे संरक्षण करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाण्याची शक्यता आहे. नागरिकांनी देखील संभाव्य आर्थिक नुकसान आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी कोणत्याही बांधकामापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या आणि ना-हरकत प्रमाणपत्रे वेळेत मिळवणे गरजेचे आहे. रेल्वेच्या या आवाहनाकडे दुर्लक्ष केल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागू शकते, त्यामुळे या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे सर्वांच्याच हिताचे ठरेल.

## धक्के-बुक्के

■ **कोकण रेल्वेचे आरक्षण फुल्ल**



कोकणातील गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या कोकण रेल्वेचे आरक्षण पाच मिनिटात फुल्ल झाले आहे. त्यामागे एजंटांचा तिकीटांचा काळाबाजार तर नाही ना? कुठलेही सरकार याची सखोल चौकशी करत नाही, हेच दुर्दैवी आहे. प्रवाशांना दिलासा मिळण्याकरिता ते गरजेचे आहे.



■ **मुंबई-गोवा महामार्गाचे साडेसाती**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाची साडेसाती चाकरमान्यांची अजूनही पाठ सोडायला तयार नाही. आता इंदापूरमधील रखडलेले काम गणेशोत्सवाआधी पूर्णत्वास जाते का ते पाहायचे! अगोदर काम झाले तर देव पावला असेच म्हणायला हवे.

■ **इगतपुरीच्या गावगुंडांचा हैदोस**



इगतपुरीच्या भावली धरण परिसरात पर्यटकांवर गावगुंडांनी हल्लाच केला नाही तर एका महिलेचा विनयभंगही करण्याचा प्रयत्न केल्याची घटना राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे बारा वाजल्याचे दर्शविते.



■ **पिंक ई रिक्षा योजनेचे अनुदान होणार दुप्पट**

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी पिंक ई रिक्षा योजनेचे अनुदान २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. या योजनेचीही 'लाडकी बहिण योजना' होऊ नये, ही अपेक्षा.

■ **दापचरीत होणार आंतरराष्ट्रीय कृषी बाजार**



पालघरच्या डहाणू तालुक्यातील दापचरीत आधी दुग्ध प्रकल्प होणार होता. आता तेथील ५५८.४३ हेक्टर जागा कृषी बाजारासाठी देण्यात येणार आहे. त्यामुळे कृषी बाजाराची अवस्था दुग्ध प्रकल्पासारखी होऊ नये म्हणजे मिळवली!

## जनमनाचा कानोसा

### रेल्वे हद्दीतील अनधिकृत बांधकामांना जबाबदार कोण?

**भारतात** रेल्वे रुळांलगत अनधिकृत बांधकामे किंवा झोपडपट्ट्या कशा फोफावतात, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून मध्य रेल्वेच्या ३० मीटरपर्यंतच्या नव्या बांधकामाबाबतच्या निर्णयाकडे पाहता येईल (नवशक्ति, १५ जुलै). मध्य रेल्वेच्या निर्णयानुसार, रेल्वेच्या सक्षम प्राधिकरणाची 'एनओसी' न घेता ३० मीटरच्या हद्दीतील नवीन बांधकाम अनधिकृत मानले जाईल व अशा बांधकामांचा भूसंपादनावेळी नुकसानभरपाईसाठी विचार केला जाणार नाही.

वास्तविक, अनधिकृत बांधकाम तात्काळ तोडले जाईल व त्याचा खर्च अनधिकृत बांधकाम करणाऱ्याकडून वसूल केला जाईल असा निर्णय व्हायला हवा होता. पण तसे न करता भूसंपादनावेळच्या नुकसानभरपाईचा मुद्दा उपस्थित करून एक प्रकारे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांसाठी आणि लाचखोर अधिकाऱ्यांसाठी एक पळवाटच रेल्वेने ठेवली आहे; ज्या पळवाटेचा फायदा अनधिकृत बांधकाम करणारे आणि लाचखोर अधिकारी निश्चितच उठवतील. या असल्या निर्णयांमुळे रेल्वेच्या भूमिकेची शंका येते.

– **विजय चव्हाण**, खोपट, ठाणे

### महागाईचा भडका वाढल्याने होरपळ

**अन्नपदार्थांच्या** वाढत्या किमतींमुळे जूनमध्ये सलग सहाव्या महिन्यात किरकोळ महागाईदरात वाढ झाली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई जूनमध्ये ४.३८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या खिशावर ताण वाढला आहे. केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने सोमवारी ही आकडेवारी जाहीर केली. अन्नधान्य, इंधन आणि काही अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे महागाईचा दबाव कायम असल्याचे संकेत आहेत. इराण-अमेरिका युद्ध पुन्हा सुरू झाल्याने देशभरात महागाई सातत्याने वाढत आहे.

या वर्षी चार टक्क्यांचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे. याचा थेट परिणाम बाजारातील इतर वस्तूंच्या किमतींवर होत आहे. महागाई ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक समस्या असून, शासनाने ठोस पावले उचलून वाढत्या महागाईवर नियंत्रण आणावे.

– **कमलाकर जाधव**, बोरिवली (पूर्व).

### वारकऱ्यांना सुरक्षा देण्यात अपयश

**'वारीची** सुरक्षा वाऱ्यावर' आजचे संपादकीय 'नवशक्ति'च्या परंपरेला अनुसरून धारदार आहे. प्रमुख इंग्रजी वर्तमानपत्रांनी ही बातमी देण्याचे टाळले आहे. आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडीतील तीन महिलांचा जेजुरीजवळ भरधाव ट्रकने जीव घेतला, ही अतिशय दुःखद घटना आहे. विठूरायाला भेटण्यासाठी माऊल्या पंढरपूरला निघाल्या होत्या. हा लाजिरवाणा अपघात दिवसा झाला आहे. महाराष्ट्राचे पोलीस वारकऱ्यांना सामान्य सुरक्षितता देण्यास अपयशी ठरले आहेत. वारकऱ्यांच्या दिंड्या शिस्तीत आणि आनंदात जात असतात. बऱ्याच जणांची एकमेकांशी ओळख असते. नव्या वारकऱ्यांशी जुनी ओळख असल्यासारखे सौख्याने एकमेकांशी वागतात. महाराष्ट्रात वारकऱ्यांनी समता, समजुतीची आणि सहिष्णुतेची संस्कृती निर्माण केली आहे. पोलिसांचे कर्तव्य वाहनांच्या पासून आणि चोरांपासून वारकऱ्यांचे संरक्षण करणे हे असते. मंत्री आणि अधिकारी यांच्या संरक्षणासाठी मोठा फौजफाटा असतो. वारकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी सरकार पोलीस बंदोबस्त ठेवत नसेल, तर हा कल्याणकारी राज्याचा विसर पडल्याचा दोष आहे. .

– **जयप्रकाश नारकर**, जि. रत्नागिरी

## बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| सोने | ₹१,४६,३०० (१० ग्रॅम) | |
| चांदी | ₹२,२६,००० (१ किलो) | |
| डॉलर ₹ | ९६.३२ | -१६ पैसे |
| सेन्सेक्स | ७७,१८५.४३ | +१३०.४९ |
| निफ्टी | २४,०७८.५० | +२६.४५ |

भारत-ब्रिटन व्यापार करारामुळे आशावाद

# द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरवर

**मुंबई :** भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार लागू झाल्यानंतर काही तासांतच एका वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्याने या ऐतिहासिक कराराबद्दल मोठा विश्वास व्यक्त केला आहे. हा करार दोन्ही भागीदार देशांसाठी "प्रत्यक्ष आणि मूर्त व्यावसायिक फायदे" देणारा ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे.

दक्षिण आशियासाठीचे युकेचे व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारताचे ब्रिटिश उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग यांनी आशा व्यक्त केली की, या करारामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ६० अब्ज डॉलर्सवरून थेट १०० अब्ज डॉलर्सवर पोहोचेल. बुधवारपासून लागू झालेल्या भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारांतर्गत भारतीय निर्यातदारांना मोठा फायदा होणार आहे. करारानुसार, भारताला दरवर्षी ११ लाख टनांपेक्षा जास्त पोलाद ब्रिटनमध्ये विना-शुल्क पाठवण्याची परवानगी मिळाली आहे. देश-विशिष्ट आणि उर्वरित कोट्याच्या सुयोग्य नियोजनातून हा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती एका सरकारी अधिकाऱ्याने दिली. २४ जुलै २०२५ रोजी स्वाक्षरी झालेल्या या सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार कराराच्या अंमलबजावणीमध्ये ब्रिटनने लागू केलेले पोलाद सुरक्षा उपाय हा सर्वात मोठा अडथळा ठरत होते. मात्र, दोन्ही देशांमधील यशस्वी चर्चेनंतर हा वाद मिटला असून १५ जुलै २०२६ पासून या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. भारताने महत्त्वाच्या उप-श्रेण्यांमध्येही आपला कोटा वाढवून घेण्यात यश मिळवले आहे. नॉन-अलॉय मर्चंट बार्स आणि लाइट सेक्शन्सचा उर्वरित कोटा ४६८ टनांवरून थेट ४,५४० टन करण्यात आला आहे. इतर वेल्डेड ट्युब्सचा उर्वरित कोटा १०,८०९ टनांवरून वाढवून १६,३२७ टन करण्यात आला आहे.

### भारत-ब्रिटन स्टील व्यापार :

- **एकूण विना-शुल्क निर्यात क्षमता :** ११ लाख टनांपेक्षा जास्त (वार्षिक)
- **प्रभावित वस्तू :** भारताकडून ब्रिटनला होणाऱ्या १३.७ कोटी डॉलर्स मूल्याच्या एकूण १८८ पोलाद उत्पादनांवर ब्रिटनच्या सुरक्षा उपायांचा फटका बसत होता.
- **भारताची एकूण पोलाद निर्यात :** वर्ष २०२५ मध्ये भारताची एकूण पोलाद निर्यात ९६ कोटी डॉलर्स होती.

### अंमलबजावणी : १५ जुलै

- **करार :** भारत-युनायटेड किंगडम सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार
- **मुख्य फायदा :** भारताच्या ९९% निर्यातीला ब्रिटनमध्ये विना-शुल्क प्रवेश
- **अतिरिक्त करार :** सामाजिक सुरक्षा करारदेखील १५ जुलैपासून लागू

### करारामुळे प्रभावित क्षेत्र

- **श्रम-प्रधान क्षेत्र :** वस्त्रोद्योग आणि कपडे, चामडे आणि पादत्राणे, हिरे आणि दागिने
- **इतर कृषी व अन्न क्षेत्र :** सागरी उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्न
- **उत्पादन क्षेत्र :** अभियांत्रिकी वस्तू, वाहनांचे सुटे भाग, रसायने आणि इतर मूल्यवर्धित उत्पादन क्षेत्र

### चर्चेनंतरचा सुधारित कोटा

भारतीय निर्यातदारांचे नुकसान टाळण्यासाठी भारताने युके प्रशासनाशी अत्यंत सखोल आणि दीर्घकाळ चर्चा केली. या तीव्र वाटाघाटींनंतर भारताने पोलाद क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे भक्कम बाजारपेठ प्रवेश मिळवला आहे. नवीन रचनेनुसार भारताचा एकूण देश-विशिष्ट कोटा वाढवून १,६८,०२९ टन करण्यात आला आहे. ऑथराईज्ड युझ स्कीम योजनेअंतर्गत भारताला ९.४५ लाख टनांचा विशेष कोटा मिळाला आहे. युकेने या योजनेतील एकूण कोट्यापैकी ४०% वाटा केवळ भारतासाठी राखीव ठेवला आहे. 'नॉन-अलॉय आणि इतर अलॉय हॉट-रोल्ड शीट्स व स्ट्रिप्स'साठी भारताचा देश-विशिष्ट कोटा तिप्पट करण्यात आला आहे. तो आता ३३,४५६ टन झाला आहे.



भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराबाबत बुधवारी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात दक्षिण आशियासाठीचे व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारतासाठीचे ब्रिटिश उप-उच्चायुक्त हरजिंदर कांग (उजवीकडून तिसरे) व इतर सहभागी झाले होते.



### कराराचे मुख्य निकष

- **व्यापार उद्दिष्ट :** द्विपक्षीय व्यापार $६० अब्जवरून $१०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणे.
- **अपेक्षित वाढ :** व्यापार क्षमतेत २५ अब्ज पाउंडची वाढ होण्याचा अंदाज.
- **भारतासाठी फायदा :** युकेमध्ये निर्यात होणाऱ्या जवळपास ९९% वस्तू आणि सेवांवर कमी किंवा शून्य शुल्क
- **युकेसाठी फायदा :** भारतात आयात होणाऱ्या ९०% वस्तू आणि सेवांवर कमी किंवा शून्य शुल्क.

### कराराचे थेट परिणाम

- **ग्राहकांना फायदा :** आयात-निर्यातीवरील शुल्क कमी किंवा शून्य झाल्यामुळे दोन्ही देशांमधील ग्राहकांसाठी वस्तूंचा खर्च कमी होईल आणि थेट आर्थिक फायदा मिळेल.
- **आर्थिक क्षेत्राला चालना :** या करारामुळे वित्तीय सेवा क्षेत्राला मोठा फायदा होणार असून, भारताची आर्थिक राजधानी मुंबईला याचा विशेष लाभ मिळेल.
- **गुंतवणुकीत वाढ :** व्यापार संबंधांचा विस्तार आणि वाढलेल्या विश्वासार्हतेमुळे दोन्ही देशांमधील परस्पर गुंतवणुकीचा प्रवाह अधिक वेगवान होईल.
- **जागतिक अस्थिरतेमध्ये स्थिरता :** सध्याच्या जागतिक भूराजकीय घडामोडी किंवा अस्थिरतेचा या द्विपक्षीय करारावर कोणताही परिणाम होणार नाही. हा करार दोन्ही देशांमधील व्यवसायांना एक शाश्वत आणि स्पष्ट चौकट प्रदान करतो.

> मध्यरात्रीपासून दोन्ही देशांनी मान्य केलेल्या नवीन व्यापारी अटींनुसार वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. दोन्ही अर्थव्यवस्थांसाठी, तसेच दोन्ही बाजारपेठांमधील ग्राहक आणि खरेदीदारांसाठी याचे अत्यंत सकारात्मक आणि मूर्त परिणाम दिसून येतील. व्यवसाय जगताने या कराराचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा यासाठी त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्यावर आमचा सध्या भर आहे. या संदेशासह युकेने नुकतेच १०,००० स्थानिक कंपन्यांपर्यंत संपर्क साधला आहे.
>
> - हरजिंदर कांग (युकेचे दक्षिण आशिया व्यापार आयुक्त)

### भागीदारीतील एक महत्त्वपूर्ण क्षण

सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार तसेच सामाजिक सुरक्षा करार लागू झाल्यामुळे आपले आर्थिक संबंध आणखी घट्ट होणार आहेत. हे दोन्ही करार आपल्या सामायिक महत्त्वाकांक्षेला आपल्या जनतेसाठी मूर्त संधींमध्ये रूपांतरित करतात. सामाजिक सुरक्षा करार युकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या भारतीय व्यावसायिकांना अमूल्य पाठबळ देईल. हे करार लोकशाही देशांमधील दृढ विश्वास आणि व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक तसेच नवोपक्रमावर आधारित एक भविष्यवेधी भागीदारी निर्माण करण्याचा आपला संकल्प दर्शवतात.

- पंतप्रधान नरेंद्र मोदी

> भारत-युनायटेड किंगडम सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार कराराची अंमलबजावणी हा एक ऐतिहासिक टप्पा आहे. यामुळे द्विपक्षीय आर्थिक संबंध लक्षणीयरीत्या मजबूत होतील. हा करार सुधारित बाजारपेठ प्रवेश, पारदर्शक नियम आणि स्थिर व्यापार चौकटीच्या माध्यमातून व्यवसायांना अधिक निश्चितता प्रदान करतो.
>
> - चंद्रजीत बॅनर्जी, महासंचालक, सीआयआय

> ऐतिहासिक करार 'विकसित भारत'च्या संकल्पनेला पूरक आहे. देशाची शाश्वत आर्थिक वाढ, जागतिक स्पर्धात्मकता, आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी सखोल जोडणी करण्याच्या आकांक्षांना यामुळे बळ मिळेल. अशा उच्च दर्जाच्या आर्थिक भागीदारी महत्त्वाचे योगदान देतील.
>
> - अनंत गोएंका, अध्यक्ष, फिक्की

## सेमीकंडक्टर, मोबाईल उत्पादनासाठी ₹ १.९० लाख कोटी

**नवी दिल्ली :** भारताची सेमीकंडक्टर परिसंस्था विस्तारण्यासाठी, मोबाईल फोन उत्पादनाला गती देण्यासाठी आणि देशाला इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंगचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी दोन मोठ्या योजनांना मंजुरी दिली आहे. या योजनांसाठी एकूण ₹ १.९० लाख कोटी (२२ अब्ज डॉलर्स) ची तरतूद करण्यात आली आहे.

सेमीकंडक्टर डिझाईन आणि उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी ₹ १.२७ लाख कोटींचा 'सेमीकॉन २.०' कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे. तसेच, देशांतर्गत मोबाईल उत्पादन वाढवणे, निर्यात वाढवणे आणि स्थानिक पातळीवरील मूल्यवर्धन अधिक मजबूत करण्यासाठी ₹ ६२,५०० कोटींची 'मोबाईल फोन मॅन्युफॅक्चरिंग योजना' मंजूर करण्यात आली आहे.

- **एकूण बजेट :** ₹ १.९० लाख कोटी
- **सेमीकॉन २.० :** ₹ १.२७ लाख कोटी
- **मोबाईल उत्पादन योजना :** ₹ ६२,५०० कोटी (आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३०-३१ पर्यंत)
- **मोबाईल उत्पादनावरील प्रोत्साहन भत्ता :** २.२५% ते ५% पर्यंत (उत्पादन आधारित)

### युरिया निर्मितीसाठी नवीन गुंतवणूक धोरण

केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी देशात १० दशलक्ष (१ कोटी) टन अतिरिक्त युरिया उत्पादन क्षमता निर्माण करण्यासाठी आणि देशात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या या खताच्या बाबतीत भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी 'राष्ट्रीय गुंतवणूक धोरण २०२६' ला मंजुरी दिली.

## निवडक

### एचडीएफसी लाइफच्या व्यवसायात वाढ

**मुंबई :** चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत एजन्सी आणि नॉन-बँक अलायन्सेस या वितरण माध्यमांनी १७% वाढ नोंदवली. पुढील काही महिन्यांत ही स्थिती आणखी सुधारेल, अशी अपेक्षा व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विभा पाडळकर यांनी व्यक्त केली.

### टाटा मोटर्स - युको बँकेची भागीदारी

**मुंबई :** टाटा मोटर्सने ग्राहकांना व्यावसायिक वाहनांसाठी संघटित फायनान्सिंग सोल्युशन्स उपलब्ध करून देण्यासाठी युको बँकेसोबत करारावर स्वाक्षरी केली आहे. युको बँकेची देशभरात उपस्थिती असण्यासह व्यापक शाखा नेटवर्क आहे.

### स्टार युनियनची विमा जनजागृती

**पणजी :** स्टार युनियन डाय-इची लाइफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत व्यापक विमा जनजागृती मोहीम राबवली. मोहिमेद्वारे गोव्यातील ३,००० हून अधिक नागरिकांपर्यंत पोहोच साधण्यात आली.

### गॅलेक्सी वॉच प्रगत एआय तंत्रज्ञानासह

**मुंबई :** 'गॅलेक्सी वॉच' प्रगत व वैयक्तिकृत एआयच्या माध्यमातून आरोग्याची काळजी घेणारे एक महत्त्वाचे माध्यम (गेटवे) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. नवीन गॅलेक्सी वॉच परिधान केल्याने आरोग्याचा नवीन स्तर अनुभवता येऊ शकतो.

### इन्स्टामार्ट - एचपीसीएल भागीदारी

**मुंबई :** भारतातील अग्रगण्य क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म इन्स्टामार्टने महारत्न केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम हिंदुस्तान पेट्रोलियमसोबत भागीदारी करून क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्मवर भारतातील पहिली ऑन-डिमांड एलपीजी सिलिंडर वितरण सेवा सुरू करण्याची घोषणा केली.

### कॅडिला फार्माची ॲसिलॉक भूमिका

**मुंबई :** कॅडिला फार्मास्युटिकल्सच्या ॲसिलॉक १५०+ आणि ॲसिलॉक ३००+ च्या उत्पादन, विक्री किंवा वितरणावर कोणताही बंदी आदेश जारी करण्यात आलेला नाही. लागू राष्ट्रीय नियामक आवश्यकतांचे पालन करत असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

### ऑगमॉँट - एनएसई सोबत भागीदारी

**मुंबई :** ऑगमॉँट एंटरप्रायझेस लिमिटेडने राष्ट्रीय शेअर बाजार अर्थात नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडियासोबत (एनएसई) ऐतिहासिक धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. ही भागीदारी भारतातील संघटित बुलियन बाजारपेठेच्या बदलातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्सचा स्वीकार अधिक वेगाने वाढविणे हा या सहकार्याचा उद्देश आहे.



# मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचा २७ वा वर्धापन दिन साजरा

**मुंबई :** मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमआरव्हीसी) माजी सीएमडी, एमडी आणि संचालक, विद्यमान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत २७ वा वार्षिक दिन साजरा केला. २०२५-२६ या वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल याप्रसंगी ३७ व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच दोन प्रकल्प युनिटना संयुक्तपणे फिरत्या ढाली (रोलिंग शील्ड) प्रदान करण्यात आल्या.

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विलास वाडेकर, सरला वाडेकर, संचालक (तांत्रिक) मनीष प्रधान, संचालक (वित्त) अभिषेक स्वामी, संचालक (प्रकल्प) एच. एस. चतुर्वेदी आणि मुख्य दक्षता अधिकारी अविनाश तारवाडकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. एमआरव्हीसीच्या वाढ आणि प्रगतीमधील योगदानाबद्दल माजी सीएमडी, एमडी, संचालकांचा सन्मान करण्यात आला.

औपचारिक कार्यक्रमानंतर कर्मचाऱ्यांनी एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. महाव्यवस्थापक (विद्युत) विनोद मेहरा यांनी स्वागतपर भाषण केले. तर ओएसडी-सह-मुख्य व्यवस्थापक (कॉर्पोरेट समन्वय) सुनील जी. उदासी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे सर्व पाहुणे, सहभागी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी आभार मानले.

वाडेकर यांनी सांगितले की, गेल्या दोन दशकांहून अधिक काळ एमआरव्हीसीने रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकार यांच्या सहकार्याने मुंबईच्या उपनगरीय रेल्वे प्रणालीसाठी परिवर्तनकारी पायाभूत सुविधा विकसित केल्या आहेत.

### प्रमाणपत्रे, स्मृतिचिन्हे

वार्षिक दिन सोहळ्याचा एक भाग म्हणून ३७ कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी प्रमाणपत्रे आणि स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली. हा एमआरव्हीसीमधील अशा प्रकारचा पहिलाच वैयक्तिक सन्मान उपक्रम आहे. भिवंडी सर्व-हवामान भुयारी मार्ग आणि विरार स्थानकावरील १५-बस सेवेसाठी हाती घेतलेल्या पायाभूत सुविधांच्या कामासाठी जबाबदार असलेल्या प्रकल्प विभागांना संयुक्तपणे 'रोलिंग शील्ड' प्रदान करण्यात आले.

# तणावाचा गुंतवणूकदारांच्या व्यवहारावर परिणाम

## सेन्सेक्स १३०.४९ अंकांनी वधारला; निफ्टीत २६.४५ अंक वाढ

**मुंबई :** बँक शेअर्समधील तेजी आणि अपेक्षेपेक्षा कमी आलेल्या अमेरिकेतील महागाईच्या आकडेवारीमुळे, फेडरल रिझर्व्ह आगामी महिन्यांत मवाळ चलनविषयक धोरण स्वीकारू शकते या आशेला बळ मिळाले. या दोन्ही कारणांमुळे बाजारातील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी मागील सत्रातील मोठ्या घसरणीतून सावरत बुधवारी वाढीसह बंद झाले.

अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे व्यवहाराच्या उत्तरार्धात गुंतवणूकदारांमधील उत्साहावर विरजण पडले, ज्यामुळे नफा वसुली दिसून आली.



सेन्सेक्स १३०.४९ अंकांनी वधारून ७७,१८५.४३ वर बंद झाला. निफ्टी २६.४५ अंकांनी वाढून २४,०७८.५० वर बंद झाला.

सेन्सेक्समधील कंपन्यांपैकी इटर्नल, अल्ट्राटेक सिमेंट, स्टेट बँक ऑफ इंडिया, बजाज फायनान्स, इंटरग्लोब एव्हिएशन आणि एशियन पेंट्स हे प्रामुख्याने नफा कमावणाऱ्या कंपन्यांमध्ये आघाडीवर होते. तर पॉवर ग्रीड, लार्सन अँड टुब्रो, टाटा स्टील आणि इन्फोसिस या कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण पाहायला मिळाली.

> आशियाई बाजारपेठेतील सकारात्मक संकेतांमुळे देशांतर्गत शेअर्सनी लवचिकता दाखवली, ज्यामध्ये लार्ज-कॅप्सच्या तुलनेत ब्रॉडर मार्केटची कामगिरी सरस राहिली. अमेरिकेतील कमी झालेल्या महागाईच्या आकडेवारीने बाजारातील विश्वासाला पाठबळ दिले, असेही त्यांनी नमूद केले.
>
> - विनोद नायर, संशोधन प्रमुख, जिओजित इन्व्हेस्टमेंट्स

## डॉलरच्या तुलनेत रुपया घसरला

**मुंबई :** पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ यामुळे बुधवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया १६ पैशांनी घसरून ९६.३२ वर बंद झाला.

आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया सकाळच्या सत्रात ९६.१२ वर होता. सत्रादरम्यान तो ९६.०४ ते ९६.३२ च्या दरम्यान राहिला. अखेर तो मागील बंदच्या तुलनेत १६ पैशांनी घसरून ९६.३२ वर स्थिरावला.

जगातील प्रमुख सहा चलनांच्या तुलनेत डॉलरची ताकद मोजणारा 'डॉलर इंडेक्स' ०.१४ टक्क्यांनी घसरून १००.७८ वर व्यवहार करत होता.

मंगळवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ४८ पैशांनी घसरून ९६.१६ वर बंद झाला होता.

## सोने १.४६ लाखांवर, चांदीत घसरण

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय राजधानीत बुधवारी सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम १.४६ लाख रुपयांवर स्थिर राहिले. मात्र, स्थानिक मागणी मंदावल्यामुळे चांदीच्या दरात सलग तिसऱ्या सत्रात घसरण झाली. ९९.९ टक्के शुद्धतेच्या पिवळ्या धातूचे दर आदल्या दिवसाच्या दराच्या तुलनेत प्रति १० ग्रॅम १,४६,३०० रुपयांवर अपरिवर्तित राहिले.

मंगळवारच्या बंद पातळीच्या तुलनेत चांदीचा दर प्रति किलोग्रॅम १०० रुपयांनी घसरून २,२६,००० रुपयांवर आला. मंगळवारी चांदी २,२६,१०० रुपये प्रति किलोग्रॅमवर बंद झाली होती. स्थानिक बाजारपेठेत ज्वेलर्स आणि औद्योगिक वापरकर्त्यांकडून खरेदी मंदावल्याने मौल्यवान धातूंचे दर मर्यादित कक्षेत राहिल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

सोशल मीडियावरील चर्चेचा इंधन वितरण कंपन्यांकडून खबरदारी

# तेल कंपन्यांकडून इंधन गुणवत्ता तपासणीत मोठी वाढ

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावरून इंधनाच्या (पेट्रोल-डिझेल) गुणवत्तेबाबत व्यक्त केल्या जाणाऱ्या शंका आणि चिंतेच्या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख तेल कंपन्या इंडियन आॅईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कंपन्यांनी ग्राहकांना दिलासा दिला आहे. या कंपन्यांनी देशभरातील आपल्या पेट्रोल पंपांवर इंधनाची गुणवत्ता तपासण्याची मोहीम तीव्र केली आहे.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी गेल्या आठवड्यात देशभरातील पेट्रोल पंपांवर तब्बल १०,००० आकस्मिक तपासण्या आणि ८,५०० हून अधिक गुणवत्ता चाचण्या केल्या आहेत. यासाठी शेकडो विशेष तपासणी पथके तैनात करण्यात आली आहेत.



इंधनाची गुणवत्ता ही इंडियनऑईलसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. ग्राहकांना निर्धारित मानकांनुसारच इंधन मिळावे यासाठी आमची पथके दररोज देशभरात काम करत असतात. नियमित तपासणी, आकस्मिक छापे आणि वैज्ञानिक चाचण्या हा आमच्या कडक गुणवत्ता हमी प्रणालीचा भाग आहेत. कंपनीने स्पष्ट केले आहे की, इंधनातील भेसळ किंवा कोणत्याही प्रकारच्या नियमांच्या उल्लंघनाबाबत कंपनी 'झिरो-टॉलरन्स' धोरण पाळते. तपासणीदरम्यान किंवा ग्राहकांच्या तक्रारींवरून कोणतीही अनियमितता आढळून आल्यास संबंधित डीलर्सवर कडक कारवाई केली जाईल.

भारत पेट्रोलियमने ३ जुलै ते १३ जुलै दरम्यान आपल्या रिटेल आऊटलेट्सवर ९३२ आकस्मिक तपासण्या केल्या. याशिवाय कंपनीच्या 'क्वालिटी कंट्रोल सेल'ने १११ तपासण्या केल्या, तर 'क्वालिटी अशुरन्स डिपार्टमेंट'ने आपल्या मोबाईल लॅबोरेटरी नेटवर्कद्वारे (फिरती प्रयोगशाळा) ५० आकस्मिक नमुने घेऊन जागच्या जागी चाचण्या केल्या. कंपनीने स्पष्ट केले की, या विशेष मोहिमेदरम्यान कोणत्याही पेट्रोल पंपावर भेसळ, दूषितीकरण किंवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे एकही प्रकरण समोर आलेले नाही.

हिंदुस्तान पेट्रोलियम या अन्य एका सार्वजनिक तेल कंपनीने ७ ते १३ जुलै दरम्यान २,१७३ आकस्मिक तपासण्या केल्या.

### भारतावर १०० टक्के आयात शुल्क लादणारे अमेरिकन सिनेटचे विधेयक सादर

अमेरिकन सिनेटर्सनी मंगळवारी रशियावरील निर्बंधांचे एक सुधारित द्विपक्षीय विधेयक सादर केले. या अंतर्गत रशियन अधिकाऱ्यांवर निर्बंध लादले जातील. तर रशियाकडून तेल आणि वायू आयात करणाऱ्या देशांवरील प्रस्तावित शुल्कामध्ये नरमाई आणली जाईल. रशियन ऊर्जेची खरेदी करणाऱ्या चीन आणि भारतासह ५ सर्वात मोठ्या देशांवर मूळ विधेयकात लावण्यात आलेले ५०० टक्के शुल्क आता कमी करून कमाल १०० टक्के करण्यात आले आहे. हे मूळ विधेयक एप्रिल २०२५ मध्ये मांडण्यात आले होते.

## अंबानींवरील तपासावर भाष्य करण्यास नकार

**नवी दिल्ली :** रिलायन्स एडीजी कंपन्यांशी संबंधित कथित बँक घोटाळ्याप्रकरणी उद्योगपती अनिल अंबानी यांचा तपास अंमलबजावणी संचालनालय आणि केंद्रीय अन्वेषण ब्युरो करत आहेत की नाही, यावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विशिष्ट भाष्य करण्यास नकार दिला. मात्र सुरू असलेल्या तपासावर देखरेख ठेवणे सुरूच ठेवले आहे. खंडपीठाने सीबीआय, ईडीचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सादर केलेला युक्तिवाद नोंदवून घेतला.



## निवडक

### राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धा

**मुंबई :** मराठी विज्ञान परिषदेतर्फे घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धेसाठी विद्यार्थी गटाकरिता (१२वी पर्यंत) 'घरातील रसायनशास्त्र' आणि खुल्या गटाकरिता 'युद्धाचे हवामानावर परिणाम' हे विषय असतील. निबंध पाठवण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट असून शब्दमर्यादा १५०० ते २००० इतकी आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्पर्धकांनी आपापले निबंध कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, रत्नागिरी विभागद्वारा डॉ. उमेश संकपाळ, रसायनशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी-४१५६१२ यांच्याकडे पाठवावेत.

### कचरा वर्गीकरणावर भर द्यावा - हायकोर्ट

**मुंबई :** कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडवर पुण्यातील मोशीसारखा डोंगर तयार होऊ देऊ नका, याघटनेची पुनरावृत्ती होणार नाही अशी, याची खबरदारी घ्या, अशी तंबी उच्च न्यायालयाने पालिका प्रशासनाला दिली. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठ्ये यांच्या खंडपीठाने स्वच्छ हवेत श्वास घेण्याचा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून निष्काळजीपणामुळे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात घालू शकत नाही, अशा शब्दांत राज्य सरकारला फटकारले. तसेच पालिकेने वार्डनिहाय कचरा वर्गीकरणावर भर द्या, असे निर्देश पालिका प्रशासनाला दिले.

### मुंबईत आज 'जस्टिस फॉरवर्ड' परिषद

**मुंबई :** 'दर्द से हमदर्द तक ट्रस्ट', 'सुप्रा लीगल फाउंडेशन' आणि 'रिनोव्हेट इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १६ जुलै रोजी मुंबईत 'जस्टिस फॉरवर्ड २०२६' या विशेष परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. कायदेशीर मदतीचे बळकटीकरण आणि भविष्यातील वकिलांचे सक्षमीकरण ही परिषदेची मुख्य संकल्पना आहे. चर्चगेट येथील बहाई सेंटर, कोर्ट चेंबर येथे दुपारी २.३० वाजता परिषदेचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाला केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन मेघवाल मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### सचिन वाझेची याचिका फेटाळली

**मुंबई :** विशेष एनआयए न्यायालयाने अँटिलिया बॉम्ब आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणातील बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेचा १५० पानांचा दोषमुक्ततेचा अर्ज फेटाळला आहे. वाझेविरुद्ध पुरेशी सामग्री उपलब्ध असून अर्जात गुणवत्ता नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# मुंबईत मलेरिया, डेंग्यूचे थैमान

◆ डेंग्यूच्या रुग्णांमध्ये २८ तर मलेरियाच्या रुग्णांमध्ये १८ टक्क्यांनी वाढ ◆ आजारांमुळे पालिका प्रशासनाची धावपळ




**मुंबई :** पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. गेल्या सात महिन्यांत मुंबईत मलेरियाच्या ३,६८१, डेंग्यूच्या ९३८ आणि लेप्टोच्या १५७ रुग्णांची नोंद झाली आहे.

विशेष म्हणजे, यंदा पाऊस कमी पडला असताना साथीच्या आजारांनी थैमान घातले आहे. मुंबईत ३६ लाख ८१ हजार ६८३ लोकांचा सर्व्हे करण्यात आला असून १० लाख ४७२ लोकांचे रक्ताचे नमुने तपासणी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

दरम्यान, मलेरिया, डेंग्यूच्या प्रसारास कारणीभूत ठरणाऱ्या एडिस व अॅनोफिलीस डासांची २७ हजार ३८२ उत्पत्तीस्थाने आढळून आली आहेत. त्यामुळे मुंबईत मलेरिया, डेंग्यू, लेप्टोचे थैमान आणखी वाढत जाणार आहे.

यंदा जून महिना कोरडा गेला असला तरी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून वरुणराजाची दमदार इनिंग सुरू आहे. जुलै महिन्यापासून पावसाची दमदार इनिंग झाली आणि साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. जानेवारी ते १४ जुलै २०२६ पर्यंत मलेरिया ३६८१, डेंग्यू ९३८, लेप्टो १५७, गॅस्ट्रो ३,८६६ कावीळ आणि चिकुनगुनियाचे ३१ तसेच स्वाईन फ्लूचे ११३ रुग्ण आढळले आहेत. जुलै महिन्याच्या गेल्या दोन आठवड्यात साथीच्या आजारांच्या रुग्णसंख्येत दुपटीने वाढ झाल्याने मुंबईत मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू, गॅस्ट्रो धोका वाढला आहे.

साथीचे आजार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने कंबर कसली आहे. तीन हजारांहून अधिक बांधकाम ठिकाणची झाडाझडती घेतली. यात ५४ हजार ७६३ मजुरांच्या रक्ताचे नमुने तपासले असता, ३७ मजुरांना मलेरियाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले.

- मलेरियाच्या प्रादुर्भावास कारणीभूत अळ्या अॅनोफिलीस - ५,३४१
- डेंग्यूच्या फैलावास कारणीभूत एडिस अळ्या २२ हजार ४१
- अडगळीचे सामान व टायर काढले - ६६, ५९५

#### अशी झाली रुग्णांची नोंद

जानेवारी ते जुलै २०२६

- मलेरिया - ३,६८१
- डेंग्यू - ९३८
- लेप्टो - १५७
- गॅस्ट्रो - ३,८६६
- एच वन एन वन - ११३
- चिकनगुनिया - ३१
- कोविड - १९ - ७१

#### याचे करावे पालन

- साबण आणि पाण्याने हाथ धुणे.
- योग्य आहार व आराम करणे,
- अति जोखमीच्या व्यक्ती विशेषत: कमी प्रतिकार शक्ती असलेले रुग्ण उदा: कॅन्सर, वृद्ध नागरिक, मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनी आजार, इत्यादी रुग्णांनी योग्य ती काळजी घ्यावी.
- नागरिकांनी ताप असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या, स्वत: औषधे घेणे टाळा आणि पालिकेची आरोग्यकेंद्रे, दवाखाना व रुग्णालयात जाऊन त्वरित सल्ला घ्या.

#### चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये मोठी घट

चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये ८२.७ टक्क्यांची मोठी घट झाली असून हा आकडा १७९ वरून ३१ वर आला आहे. गॅस्ट्रोएन्टेरायटिसचे रुग्ण २० टक्क्यांनी घटून ४,८३१ वरून ३,८६६ झाले आहेत. कोव्हिड-१९ च्या संकरित रुग्णांमध्ये ९३ टक्क्यांहून अधिक घट झाली असून संख्या १,०४९ वरून ७१ वर आली आहे, तरीही एचएन१ इन्फ्लूएंझाचे रुग्ण जवळपास तिप्पट वाढले असून त्यांची संख्या ४२ वरून ११३ झाली आहे.

# अकरावी प्रवेशासाठी १६ जुलैपासून पुढील फेरी

**मुंबई :** अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नियमित तीन फेऱ्या आणि विशेष दोन फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरही प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी १६ जुलैपासून पुढील प्रवेश फेरीचे वेळापत्रक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे.

या फेरीत नवीन विद्यार्थ्यांना नोंदणी, अर्जातील दुरुस्ती आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या पसंतीक्रमाची नोंद करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जाहीर वेळापत्रकानुसार १६ जुलै दुपारी ३ वाजेपासून १८ जुलै सायंकाळी ६ वाजेपर्यंत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्जातील दुरुस्ती आणि भाग-२ भरण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविता येणार आहेत.

या फेरीसाठी प्रवेश वाटप प्रक्रिया १९ जुलै रोजी पार पडणार असून २० जुलै रोजी सकाळी १० वाजता



प्रवेश यादी आणि कटऑफ जाहीर करण्यात येणार आहेत. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना २० जुलै ते २२ जुलै या कालावधीत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

त्यानंतर २३ जुलै रोजी माहिती प्रक्रिया करण्यात येऊन २४ जुलै रोजी दुपारी १ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध केली जाईल. राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीचे वर्ग १५ जुलैपासून सुरू होत असल्याने विद्यार्थी आणि पालकांनी वेळापत्रकानुसार सर्व कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

# भुसावळ पालिकेच्या सभेत २९९ विषयांना मंजुरी

मोकाट कुत्रे, उघड्यावरील मांस विक्रीसह पथदिव्यांचा प्रश्न गाजला

**भुसावळ ।** भाजपा सत्ताकाळातील प्रभारी नगराध्यक्षा शैलजा नारखेडे यांच्या उपस्थितीत गुरुवारी सकाळी ११ वाजता पालिका सभागृहात झालेल्या सर्वसाधारण सभेत एक विषय वगळता २९९ विषयांना सत्ताधार्यांनी बहुमतांनी मंजुरी दिली. शहरातील मोकाट कुत्रे, २४ तास सुरू असलेले पथदिवे तसेच उघड्यावर होणारी मांस विक्री व नाल्यांमध्ये टाकण्यात येणारी घाणीवरून सत्ताधार्यांनी पालिका प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. यावेळी पालिका मुख्याधिकार्यांनी दोषींविरोधात ठोस कारवाईचे आश्वासन दिले. पालिकेतील विरोधी गट असलेल्या राष्ट्रवादीच्या नगरसेविकांनी सभेच्या एक दिवसापूर्वीच जिल्हाधिकार्यांना निवेदन देत सभा बेकायदेशीर असल्याचे म्हणत सभेकडे पाठ फिरवली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी नगराध्यक्षा शैलजा नारखेडे होते. व्यासपीठावर गटनेता युवराज लोणारी, प्रभारी मुख्याधिकारी विवेक धांडे उपस्थित होते.



### शहरातील उद्यांनाची दुरवस्था

**नगरसेवक** किरण कोलते म्हणाले की, महापुरुषांच्या नावाने असलेल्या शहरातील सर्वच उद्यानांची दुरवस्था झाली आहे. गतवेळी कंत्राट देण्यात आले मात्र पालिका अधिकार्यांनी ढुंकूनही या उद्यानांकडे पाहिले नाही. दोषी अधिकारी व कंत्राटदारा व संबंधितांचे बिल काढणार्यांवर कारवाई हवी.

### चुकीच्या सर्वेचा फटका नागरिकांना

**नगरसेवक** गिरीश महाजन यांनी घरपट्टी संदर्भात मागच्या वेळी चुकीच्या पद्धतीने केलेल्या सर्वेवर बोट ठेवले. नगरसेवक बबलू बर्हाटे यांनी शहरातील पालिकेच्या संकुलांची दुरुस्ती करताना शौचालयांची दुरुस्ती करून ते पे अॅण्ड युज तत्वावर चालवण्यासाठी देण्याचे सूचवले.

### नाल्यांमध्ये घाण टाकणार्या व्यापारी व दुकानदारांवर हवी कारवाई

**नगरसेवक** पिंटू कोठारी यांनी आक्रमकपणे शहरातील रखडलेल्या नालेसफाईकडे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पांडुरंग टॉकीजजवळ रेती व्यावसायीक गाळलेली रेती थेट नाल्यात टाकतो त्यामुळे नाला तुंबत असल्याने त्याच्यावर कारवाई हवी. शहरातील विविध भागातील नाले सफाईचे छायाचित्रे त्यांनी सभागृहात झळकावली. यास जवाबदारी काही व्यापारी व हातगाडीवर साहित्य विक्री करणारे विक्रेते असल्याने त्यांच्यावर कारवाईची मागणी त्यांनी केली. दरवर्षी ८० लाख रुपये नालेसफाईवर खर्च होतात मात्र आताच उपाययोजना केल्यास अनाठायी खर्च वाचेल, असे ते म्हणाले. अमृत योजनेला किमान अडीच वर्ष लागतील मात्र तोपर्यंत पर्यायी प्रश्न कसा सोडवता येईल, याबाबतचे मॉड्यूल कोठारींनी सभागृहाला सांगितले.

### उघड्यावर मांस विक्रीचा प्रश्न गाजला

**शहरातील** विविध भागात उघड्यावर होणार्या मांस विक्रीचा प्रश्न चांगलाच गाजला. नगरसेविका सोनल महाजन, गिरीश महाजन, पिंटू कोठारी, विशाल नाटकर आदींनी याप्रश्नी आवाज उचलत विक्रेत्यांवर कारवाईची मागणी केली. विक्रेते मांस विक्रीनंतरचा कचरा थेट नालीत टाकल्याने दुर्गंधी पसरून आरोग्य धोक्यात येत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

# अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम...



**शहादा ।** विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी परिचित करून देत त्यांच्यात आत्मविश्वास आणि शैक्षणिक प्रेरणा निर्माण करण्याचा उद्देशाने येथील (कै.) सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेत अकरावीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी इंडक्शन (परिचय) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या सुरेखा पाटील कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालयाचे प्राचार्य ईश्वर पाटील उपस्थित होते. सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी कला शाखेचे वरिष्ठ शिक्षक एच. एस. चव्हाण यांनी महाविद्यालयीन जीवन हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगत, शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करताना नवीन अभ्यासपद्धती, नियम, सुविधा आणि विविध उपक्रमांची माहिती असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. इंडक्शन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी जुळवून घेणे सुलभ होते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंदी विभागाचे प्रमुख कनिष्ठ व्याख्याते सतीश निळे तसेच वाणिज्य शाखेचे प्रा.विश्वनाथ चौधरी यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिस्त, नियम, अभ्यासक्रम, उपलब्ध सुविधा, विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रम तसेच शिक्षकांचा परिचय करून दिला.

यावेळी वरिष्ठ प्रा. केशव वळवी, रंजना पावरा यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्यात आपलेपणाची भावना निर्माण करणे, प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी परिचय करून देणे, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे तसेच विविध अभ्यासेतर उपक्रमांची माहिती देऊन सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी सावकार यांनी केले, तर आभार हर्षदा पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कला व वाणिज्य शाखेतील तसेच सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# उच्च दर्जाच्या बियाण्यांसाठी सर्वसमावेशक धोरण आणणार

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध व्हावे तसेच निकृष्ट अथवा बनावट बियाण्यांमुळे त्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी राज्य सरकार सर्वसमावेशक धोरण तयार करणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी दिली.

बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत बदल करून नवीन मानक कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या बियाणेविषयक तक्रारींवर तातडीने कार्यवाही, तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता, आणि निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येईल, असे भरणे यांनी या बैठकीत स्पष्ट केले.

परराज्यातून येणाऱ्या बियाण्यांवर विशेष तपासणी उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येणार आहे.

# सूतगिरणीच्या संभाव्य लिलावाच्या पार्श्वभूमीवर १८ जुलैला चिंतन बैठक

**शहादा ।** उंटावद - होळ (ता.शहादा) येथील लोकनायक जयप्रकाश नारायण सहकारी सूतगिरणीच्या संभाव्य लिलावाबाबत सभासद, शेतकरी व कामगारांमध्ये वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर (ता.१८) जुलै शनिवारी, सायंकाळी चार वाजता येथील लोणखेडा बायपास रस्त्यावरील शिव प्लाझा लॉन्स येथे चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले असून बैठकीला परिसरातील शेतकरी, गिरणीचे सभासद, कामगार तसेच विद्यमान संचालक मंडळानेही उपस्थित राहावे असे आवाहन शहाद्याचे लोकनियुक्त अभिजीत पाटील यांनी केले आहे.

यावेळी श्री पाटील यांनी सांगितले की, लोकनायक जयप्रकाश नारायण सहकारी सुतगिरणीचा संभाव्य लिलावा बाबत वृत्तपत्र तसेच सोशल मीडियावर जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर सभासदांकडून संचालक मंडळाकडे वेळोवेळी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप विद्यमान संचालक मंडळाकडून कोणतीही ठोस भूमिका जाहीर करण्यात आलेली नसल्याने सभासद, शेतकरी आणि हितचिंतकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. तत्कालीन समाजधुरिणांच्या मार्गदर्शनातून आणि समाजाच्या योगदानातून उभारण्यात आलेल्या या सहकारी सूतगिरणीचे १२ हजार सभासद असून अनेक कामगार आहेत.या सूतगिरणीच्या भवितव्याबाबत सविस्तर चर्चा करून पुढील दिशा निश्चित करण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस सूतगिरणीचे सर्व सभासद, शेतकरी, कामगार तसेच सूतगिरणीच्या अस्तित्वाबाबत संवेदनशील असलेले सर्व हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अभिजीत पाटील यांनी केले आहे. गिरणीच्या लिलावाबाबत चेअरमन व विद्यमान संचालक मंडळाने खुलासा करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी खुलासा केला नसल्याने परिसरातील शेतकरी सभासद व कामगारांमध्ये असंतोष आहे.

# उंच पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जन नको!

परवानगी न देण्यासाठी हायकोर्टाला साकडे



**मुंबई :** गणेशोत्सव दोन महिन्यांवर येऊन ठेपला असताना प्रसिद्ध 'लालबागचा राजा'सारख्या ६ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या 'प्लास्टर ऑफ पॅरिस'पासून बनवलेल्या गणेशमूर्तींचे कोणत्याही नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जन करण्यास परवानगी दिली जाऊ नये, अशी विनंती बुधवारी उच्च न्यायालयाला करण्यात आली.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर अंतिम युक्तीवादाला सुरुवात झाली. यावेळी सहा फूटांवरील पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत भूमिका मांडण्यात आली.

पीओपी गणेशमूर्ती विसर्जनाचा वाद उच्च न्यायालयात पोहोचला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पीओपी मूर्तींबाबत बदललेल्या भूमिकेला आव्हान देणारी याचिका ठाण्यातील पर्यावरणवादी कार्यकर्ते रोहित जोशी यांनी अॅड. रोनिता भट्टाचार्य यांच्यामार्फत दाखल केली आहे. शाडूच्या मातीच्या मूर्तिकारांनी आव्हान दिले आहे. तर पीओपी मूर्तिकारांच्या संघटनांनीदेखील याचिका दाखल करत पीओपी बंदीमुळे रोजगारावर गदा येत असल्याचा दावा केला आहे.

याचिकेवर न्या. अजय गडकरी आणि न्या. कमल खाता यांच्या खंडपीठासमोर अंतिम युक्तीवादाला सुरुवात झाली. यावेळी पीओपीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत याचिककर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मिहीर देसाई यांनी युक्तिवाद केला.

#### न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष

पीओपी गणेशमूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतातील विसर्जनाबाबतच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांच्या कायदेशीर बंधनकारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने अंतिम युक्तिवाद ऐकून घेण्यास सुरुवात केली आहे. या प्रकरणात न्यायालय कोणता अंतिम निर्णय देणार याकडे मुंबई शहर व उपनगरांतील विविध गणेशोत्सव मंडळांचे लक्ष लागले आहे.

विश्वासार्ह पुराव्यांची आवश्यकता -हायकोर्ट

# जन्मदाखल्यात बदल करण्याचा पालिकेला अधिकार

**मुंबई :** मुलाच्या अथवा मुलीच्या जन्मदाखल्यातील नोंद चुकीची असल्याचे विश्वासार्ह पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्यास ती दुरुस्त करण्याचा अधिकार पालिका प्रशासनाला आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा हायकोर्टाने दिला.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने हा निर्वाळा देताना एका अल्पवयीन मुलीच्या जन्मदाखल्यातील वडिलांचे नाव बदलून तिच्या जैविक वडिलांचे नाव नोंदविण्याचे आदेश मुंबई महापालिकेला दिले.

याचिकाकर्त्या महिलेचे २००६ मध्ये पहिले लग्न झाले होते. मात्र काही काळाने पती-पत्नीमध्ये मतभेद झाल्यामुळे ते वेगळे राहू लागले. दरम्यानच्या काळात महिलेचे दुसऱ्या एका व्यक्तीसोबत संबंध निर्माण झाले आणि २००९ मध्ये तिने एका मुलीला जन्म दिला.

मुलगी जन्माला आली तेव्हा महिलेचा घटस्फोट न झाल्याने पहिला विवाह कायद्याने कायम होता. त्यामुळे नियमानुसार जन्म दाखल्यात वडिलांच्या जागी तिच्या पहिल्या पतीचे नाव नोंदविण्यात आले. त्यानंतर पहिल्या पतीसोबत अधिकृत घटस्फोट झाल्यानंतर महिलेने मुलीच्या जैविक वडिलांशी रितसर विवाह केला आणि दोघांनी संयुक्तपणे मुंबई पालिकेकडे जन्मतारखेतील वडिलांचे नाव दुरुस्त करण्याची मागणी केली.

मात्र पालिकेने नकार दिला. अखेर महिलेने ज्येष्ठ वकील उदय वारुंजीकर, अॅड आदित्य खारकर, अॅड जिनेश जैन यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल करून जन्मदाखल्यातून पहिल्या पतीचे नाव काढून टाकून मुलीच्या जैविक वडिलांचे नाव नोंदविण्याचे निर्देश महापालिकेला द्यावेत, तसेच मुलीच्या जन्माशी संबंधित नोंदी गोपनीय ठेवाव्यात, अशी मागणी करत याचिका दाखल केली.




#### सुधारित जन्मदाखला ३० दिवसांच्या आत जारी करा

या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकेसोबत सादर केलेल्या डीएनए पितृत्व चाचणीत संबंधित कागदपत्रे आईने शपथपत्राद्वारे पहिला पती मुलीचा जैविक पिता नसल्याचे स्पष्ट केले. तर दुसऱ्या व्यक्तीने स्वत: जैविक पिता असल्याचे मान्य केले. याची दखल घेत खंडपीठाने जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम-१५ चा संदर्भ देत, पुरेसा आणि विश्वासार्ह पुरावा उपलब्ध असल्यास जन्मदाखल्यातील चुकीची नोंद दुरुस्त करता येते, असे स्पष्ट करत याचिका मंजूर करून मुलीच्या जन्मदाखल्यातून आधीच्या पतीचे नाव वगळून जैविक वडिलांचे नाव नोंदविण्याचे आदेश पालिकेला दिले. तसेच सुधारित जन्मदाखला ३० दिवसांच्या आत जारी करण्याचे निकालात स्पष्ट केले.

जनशक्ति
संस्थापक – स्व. ब्रिजलालभाऊ पाटील
संस्थापक संपादक – स्व. कुंदनदादा दत्तात्रय ढाके
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक **योगेश्वर दत्तात्रय ढाके** यांनी भास्कर प्रिंटींग प्रेस, गट नं. २३८/२, कासट कम्पाउंड, पाळधी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथे मुद्रीत करुन ३, दुसरा माळा, रायसोनी चेंबर्स, चित्रा चौक, नवी पेठ,जळगाव-४२५००१(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ संपादक – **त्र्यंबक केदूजी कापडे*** » (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) ई-मेल – jalgaon@janashakti.in स्थापना : १९५६
संपर्क : संपादकीय – ९८२३४४८५४४, व्यवस्थापकीय – ९५४५४७९९८९.